
www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 291  रविवार दि. 06 जुलै २०२५  किंमत : 2 रु  पृष्ठ : ४




# विठ्ठल.. विठ्ठल.. जय हरी विठ्ठल ;

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडली विठ्ठल - रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा

सोलापूर : चंद्रभागेच्या तिरी.. पहा मंदिरी तो पहा विटेवरी... विठ्ठल विठ्ठल जयहरी...दुमदुमली पंढरी पांडुरंग हरी तो पहा विटेवरी.. विठ्ठल विठ्ठल जयहरी... असेच काहीस चित्र सध्या पंढरपुरात पाहायला मिळत आहे. आज रविवार, आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा. यंदा आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांची पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत मानाचे वारकरी म्हणून कैलास दामू उगले (वय ५२ वर्षे) आणि त्यांची पत्नी कल्पना कैलास उगले (वय ४८ वर्षे) मु. पो. जातेगांव, ता. नांदगाव जि. नाशिक यांना महापूजेचा मान मिळाला. दाम्पत्य गेल्या १० ते १२ वर्षापासून नियमितपणे वारी करत आहेत. कैलास यांचे वडील माजी सैनिक आहेत. शासकीय महापूजेवेळी राज्याचे मंत्री गिरीश महाजन, जयकुमार गोरे यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, राजेंद्र शेळके, मनोज शोत्री यांच्यासह अन्य अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



## आषाढी एकादशीः मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठुरायाची महापूजा, नाशिक जिल्ह्याला सलग दुसऱ्या वर्षी मिळाला मान

सोलापूर : आषाढी एकादशीचा सोहळा आज होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मातेची शासकीय पूजा होणार आहे. या शासकीय पूजेवेळी मानाचे वारकरी म्हणून नाशिकच्या दाम्पत्यांना मान मिळाला आहे.

आषाढी महापूजेसाठी कैलास दामू उगले (वय ५२) व कल्पना कैलास उगले (वय ४८) रा. जातेगांव, ता. नांदगांव, जि. नाशिक यांना मान मिळाला आहे. या दाम्पत्यांचा कैलास उगले यांचे वडील माजी सैनिक होते. आषाढीच्या सोहळ्यासाठी पंढरपुरात १५ लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. विठ्ठलाचे दर्शनाची रांग पाच किलोमीटर पर्यंत पोहोचली आहे. चंद्रभागेच्या तीरावर स्नान करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.



पंढरपूर येथे आषाढी एकादशी निमित्त श्री विठ्ठलाच्या शासकीय महापूजेचा मानाचा वारकरी म्हणून बाळू शंकर अहिरे ( वय ५५) व आशाबाई बाळू अहिरे ( वय ५०, रा. अंबासन, ता. सटाणा, जिल्हा नाशिक) या दापत्याची मागील वर्षी 2024 मध्ये निवड करण्यात आली होती. आता सलग दुसऱ्या वर्षी नाशिक जिल्ह्यातील वारकरी दांपत्याला हा मान मिळाला आहे. तर 2023 मध्येही कार्तिकी एकादशीला एकादशीच्या महापूजेचा मान नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील बबनराव घुगे आणि वत्सला घुगे या दांपत्याला मिळाला होता.

## महाराष्ट्रातील नव्हे तर जगातील सर्व साधुसंत व महाराजांच्या दिंडी व पालखी सोहळ्यांचा आज तीर्थक्षेत्र पंढरपूर नगरीमध्ये उत्साही वातावरणात प्रवेश "

दैनिक युवक आधार
पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर

आषाढी एकादशीच्या निमित्ताने गेल्या अनेक वर्षापासून परंपरेप्रमाणे वरीतीरीवाजाप्रमाणे महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यातून ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषा मध्ये डोंगरदऱ्यातून कड्या कपाऱ्यातून ऊन पावसाची तमा न बाळगता केवळ श्री विठ्ठल रुक्मिणी माता यांच्या दर्शनाचा ध्यास मनी ठेवून आनंदाने नाचत बागडत टाळ मृदुंगाच्या गजरात अभंग फुगड्या किर्तन प्रवचन भजन गवळणी आडवे रिंगण उभे रिंगण या सर्वांचा आनंद घेत कित्येक दिवस पायी प्रवास करून दिंडी व पालखी सोहळ्यातून आषाढी एकादशी दिवशी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेण्यासाठी असंख्य भाविक भक्तांचा आज रोजी तीर्थक्षेत्र पंढरपूर नगरीमध्ये प्रवेश झाला हा भाविक भक्तांच्या "दृष्टीने दुग्धशर्करा योग आहे"याच क्षणाची कित्येक दिवस जे भाविक भक्त आतुरतेने वाट पाहत होते तो क्षण आज त्यांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो आहे यापेक्षा भाग्य ते काय असते. अशा प्रकारच्या सर्व भाविक भक्तांच्या बोलक्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.




त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात
डिजिटल माध्यमातून
पोहचणारे दैनिक
PRESS
दैनिक युवक आधार मराठी
तरुणांचा बुलंद आवाज
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका,
जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा,
विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९



# मुंबईत दुमदुमला मराठीचा आवाज

## वरळी डोम येथे राज व उद्धव ठाकरे एकत्र !



**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज);**
तब्बल वीस वर्षानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र आले. हिंदी सक्तीचा राज्य सरकारने आदेश मागे घेतल्यानंतर दोन्ही ठाकरे हे मराठी विजयी मेळाव्याच्या निमित्ताने वरळी डोम याठिकाणी एकत्र आले.आवाज मराठीचा या विजयी मेळाव्याला लाखोंच्या संख्येने राज ठाकरे आणि उध्दव ठाकरे यांच्या असंख्य कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.यावेळी मराठीच्या घोषणांनी अवघा परिसर दुमदूमला.वरळी डोम येथे आवाज मराठीचा हा विजयी मेळावा आयोजित करण्यात आला होता.यावेळी याठिकाणी संजय राऊत,बाळा नांदगांवकर,आदित्य ठाकरे,अमित ठाकरे,अनिल परब,सुप्रिया सुळे,जितेंद्र आव्हाड,शेकापचे जयंत पाटील यासह विविध राजकीय पक्षांचे नेते आणि मराठी चित्रपट सृष्टीतील कलाकारांनी हजेरी लावली होती.हिंदी सक्तीच्या आदेशाविरोधात या दिवशी (०५ जुलै)भव्य मोर्चा आयोजित करण्याचे ठरले होते.दरम्यान हिंदी सक्तीचा आदेश राज्य सरकार कडून मागे घेण्यात आल्यानंतर मोर्चा ऐवजी विजयी मेळावा आयोजित करण्याचे ठरले होते. त्यानुसार हा मेळावा काल मुंबईत पार पडला. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गेल्या वीस वर्षापासून ज्या प्रसंगाची आतुरता होती,जो प्रसंग घडवण्यासाठी मराठी मनामध्ये सातत्याने कुठेतरी चर्चा होत होती.दोन बंधूंमधील मतभेद दूर करून त्यांनी एकत्रित लढलं पाहिजे असेही बोलले जात होते,तो प्रसंग काल अवघ्या महाराष्ट्राने पाहिला आणि क्षणभर स्तब्ध झाला.शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल या मराठी विजय मेळाव्यामध्ये एकमेकांची गळा भेट घेतली आणि अवघा महाराष्ट्र काही क्षणासाठी स्तब्ध झाला.दोघांची विचारधारा प्रबोधनकार ठाकरेंपासून असल्याने या भेटीमध्ये अवघ्या महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचे लक्ष लागून राहिले होते.दोघांनीही मराठीवरून महाराष्ट्राला आवाहन करताना मराठी म्हणून एकत्र राहण्याचे आवाहन या विजयी मेळाव्यामध्ये केले.उद्धव ठाकरे यांनी मेळाव्यात बोलताना भाजप आणि भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाचा बुरखा फाडण्याचा प्रयत्न केला.राज ठाकरे यांनी मराठी भाषा,संस्कृतीवर विवेचन करताना भाजपकडून होणाऱ्या आरोपाला सुद्धा प्रत्युत्तर देत एक प्रकारे देशभरातील नेत्यांची शाळा कोणत्याही भाषेतून झाली असली,तरी त्यांचा मातृभाषेसाठी असलेला कडवटपणा सुद्धा दाखवून दिला.२० वर्षे जे बाळासाहेबांना किंवा अनेक नेत्यांना जमले नाही ते देवेंद्र फडणवीसांना जमले अशी भाषणाची सुरुवात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केली.राज ठाकरे यांनी भाषणात उद्धव ठाकरे यांचा सन्माननीय असा उल्लेख केला.फक्त मोर्चाच्या घोषणेनेच सरकारने आदेश मागे घेतला,असेही राज म्हणाले.हिंदी सक्तीच्या विरोधात सरकारला वारंवार पत्र लिहली,त्यानंतर दादा भुसे यांनी भेट घेतली,त्यावेळी त्यांना तुमचे ऐकून घेईन पण मी ऐकणार नाही,असेही राज ठाकरे म्हणाले.महाराष्ट्र पेटून उठतो त्यावेळी काय होत हे राज्यकर्त्यांना समजल असेल,असेही राज यावेळी या विजयी मेळाव्यात म्हणाले.या कार्यक्रमाच्या शेवटी दोन्ही ठाकरे परिवारातील सर्व सदस्य स्टेजवर आले होते.हे चित्र महाराष्ट्रातील सर्व मराठी जणांना सुखावणारे होते.तसेच या आवाज मराठीचा या विजयी मेळाव्यात दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता.



# ट्रेलरच्या धडकेने मोटार सायकलस्वाराचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: ट्रेलरच्या धडकेने एका मोटार सायकलस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील जुना मुंबई-पुणे हायवेववर एस.व्ही.मोटार्स पळस्पे समोरील रस्त्यावर घडली आहे. मोटार सायकलस्वार राहूल ढेपे (38 रा.वडाळा) हा त्याची मोटार सायकल घेवून आपल्या गावी माणगाव या ठिकाणी जात असताना पनवेल जवळील जुना मुंबई-पुणे हायवेववर एस.व्ही.मोटार्स पळस्पे येथे त्याच्या गाडीला ट्रेलरची धडक बसल्याने झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

=========================

# डिझेलजन्य ज्वलनशिल पदार्थांच्या मुद्देमालाचा तळोजा पोलीस करणार जाहीर लिलाव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

डिझेलजन्य ज्वलनशील पिवळसर द्रव्य पदार्थाचा मुद्देमाल जप्त केला असून त्याचा लिलाव तळोजा पोलीस ठाण्याच्या माध्यमातून दि.7/7/2025 रोजी करण्यात येणार आहे.
700 लिटर डिझेल जन्य ज्वलनशिल पिवळसर द्रव्य पदार्थ असा मुद्देमाल तळोजा पोलिसांनी जप्त केला आहे. सदर मुद्देमालाचा जाहीर लिलाव दि.7/7/2025 रोजी सकाळी 11 वाजता तळोजा पोलीस ठाण्याच्या आवारात करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुकांनी तत्पूर्वी तळोजा पोलीस ठाण्याचे दुरध्वनी क्र.022-27412333, मो.नं.9822761090, 9821226812, 9870301090 यावर संपर्क साधावा, असे आवाहन वपोनि प्रवीण भगत यांनी केले आहे.

-=============================

# मोटार सायकलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: शहरातील विश्राळी नाका जी.एम.वाईन्स शॉप येथे उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. हर्षद दळवी यांनी त्यांची 25 हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची डिओ मोटार सायकल क्र.एमएच-01-सीएक्स-7659 राखाडी रंगाची ही सदर ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

============================

# कामोठे येथून माय-लेक बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: कामोठे गाव सेक्टर 14 येथे राहणारी जमुनाबाई गुरुनाथ राठोड (35) ही महिला आपल्या तुषार गुरुनाथ राठोड (8) या मुलासह घरातुन कोणास काही एक न सांगता निघुन गेली आहे. ती अद्याप परत न आल्याने ती हरवल्याची तक्रार तिचे पती गुरुनाथ रामचंद्र राठोड यांनी कामोठे पोलीस ठाण्यात दिली आहे. सदर महिला कुणाला कोठे आढळल्यास त्यांनी कामोठे पोलिस ठाणे फोन नं. 8655354114 येथे किंवा पो. हवालदार माने यांच्याशी 9870226205 येथे संपर्क साधावा.

============================

# फ्रिजला लागली आग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : उमरोली येथील घरातील फ्रिजला लागलेल्या आगीत घरातील वस्तू जळून खाक झाल्या. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. मात्र घरातील वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले
प्रकाश मढवी यांच्या उमरोली येथील घरातील फ्रिजला आग लागली. फ्रिजचा कॉम्प्रेसरचा स्फोट झाला. आग लागली त्यावेळेस घर बंद होते. या आगीत घरातील वस्तू जळून खाक झाल्या आहेत. गावातील नागरिकांनी ही आग विझवली. सुदैवाने आगीत कोणतीही जीवित हानी झालेली नाही. यावेळी घटनास्थळी पोलिसांनी येऊन पाहणी केली. ग्रामपंचायतने पंचनामा केला आहे. गेल्या काही दिवसांपासून नेरे परिसरात महावितरण चे तीन तेरा वाजले आहेत. दिवसा तसेच रात्री वीज गायब होत आहे. विज येजा करत असल्याने अनेक उपकरणे नादुरुस्त होत आहेत. विजेच्या फ्लॅक्चुएशन मुळे ही आग लागली असल्याचे बोलले जात आहे. आगीत मोठ्या प्रमाणात वस्तूंचे नुकसान झाल्याने समाजातील दानशुरांकडून मदतीचे आवाहन करण्यात येत आहे.

# तुझ्या दर्शनाची आस, कधी थांबायची नाही ,उभ्या जन्मात विठ्ठला ,वारी चुकायची नाही विठ्ठल भक्तांनी अंतर्मनाने मारली हाक!

दैनिक युवक आधार

हिंदू धर्मात प्रत्येक क्षण पवित्र मानला जातो. ज्यामध्ये संकष्टी एकादशी व मासिक एकादशी समावेश असतो. हिंदू पंचांगानुसार महिन्याला दोन वेळा एकादशी येते. एक कृष्ण पक्षात येते तर दुसरी शुक्ल पक्षात येते. अशाप्रकारे २४ एकादशी वर्षात येत असतात परंतु २४ दशकातील एक अत्यंत खास एकादश मानली जाते. त्याची करोडो वारकरी दरवर्षी वाट पाहत असतात. आषाढी महिन्याच्या शुक्ल पक्षात येणाऱ्या आषाढी एकादशीला सर्वोत्तम मानले जाते. याच एकादशीला देवशयांनी मानले जाते. या एकादशीचे व्रत करणाऱ्या व्यक्तींना पापा पासून मुक्ती मूर्ती असे मानले जाते.

यावर्षी हिंदू पंचांगानुसार रविवार दिनांक ०६-०७-२०२५ या दिवशी आषाढी एकादशी आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनाला विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपूर आषाढी एकादशीला चालत येतात. चंद्रभागेत स्नान करून विठुरायाचे दर्शन घेतात. याच दिवशी पंढरपुरास आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वर येथून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, उत्तर भारतातून कबीरांची पालखी येते.

सुमारे २८ युगापूर्वी श्रीकृष्ण रुसून गेलेल्या आपल्या रुक्मिणीला शोधण्यासाठी द्वारकेतून दिंडीत वनात शोधण्यासाठी आले. त्याचवेळी भगवंत पुंडलिकांना भेटायला आले असता पुंडलिक आई-वडिलांची सेवा करत होते त्यामुळे भगवंताला बसण्यासाठी पाठ न देता वीट दिली होती त्याच विटेवर भगवंत उभे राहिले. आई-वडिलांची सेवा करून पुंडलिक भगवंत विटेवर उभे राहिले. भगवंताने राग न मानता आई-वडिलांची सेवा करणारा आदर्श पुढील पिढीसमोर सदैव राहावा,




माझ्या भेटीला येण्याआधी सर्व भक्त 'तुझे स्मरण करून मगच माझे दर्शन घेतील.' त्यामुळे भगवंताने पंढरपूरचा मुक्काम स्वीकारला.

कित्येक वर्षापासून शेकडो भाविक पंढरपूरला आषाढी एकादशीला जातात. यामध्ये महिला पुरुष लहान मुले इत्यादींचा पारंपरिक वेशभूषा परिधान करून पालखीमध्ये सहभागी होतात. पूर्वीपासून ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक आपत्तीला तोंड देत विठ्ठल भक्त आपली वारी विठ्ठल नामाचा जयघोष करीत पूर्ण करतो.

शेकडो दशकापासून ज्यांनी पंढरीची वारी पायी प्रत्येक वर्षी पूर्ण केलेली आहे. त्यांना विठ्ठलाच्या भक्तीने दरवर्षी विठ्ठल भक्त वारी *तुझ्या दर्शनाची आस, कधी थांबायची नाही ,उभ्या जन्मात विठ्ठला ,वारी चुकायची नाही* यानुसार अखंडपणे करतो. कोणताही जात धर्म भेदभाव न बाळगता एकमेकांना वारीत सांभाळून घेतात.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असल्यामुळे वारकरी संप्रदाय यांचा फार मुलाचा वाटा आहे. त्यामुळे अजूनही महाराष्ट्रात संस्कृती जपली जाते. पण अखंडपणे पंढरीची वारी करणाऱ्या विठ्ठल भक्तांना कोणत्या ना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात विठ्ठल भक्त आपले अदृश्य दर्शन देऊन मनोकामना पूर्ण करतो हे नक्कीच!

# आषाढी एकादशीचा सोहळा शाळेत उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

**एरंडोल** :- आषाढी एकादशी हा भगवान श्री विठ्ठलाचा शुभ दिवस असून, या दिवशीचा शाळेतील कार्यक्रम फर्स्ट स्टेप प्री प्रायमरी स्कूल एरंडोल येथे उत्साहात साजरा करण्यात आला. आषाढी एकादशी, ज्याला देवशयनी एकादशी असेही म्हणतात, हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा दिवस असून या दिवशी विष्णू योगनिद्रेत जातात, अशी श्रद्धा आहे. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून 'ज्ञानोबा-माउली-तुकारामा' च्या गजरात दिंडी काढली. या दिंडीमुळे परिसर भक्तिमय झाला होता. विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, नाटक आणि गाण्यांच्या माध्यमातून आषाढी एकादशीचे महत्त्व, भक्तीभाव आणि संतांची शिकवण सादर केली. विद्यार्थ्यांनी भजनांद्वारे भगवान विष्णूची स्तुती केली आणि कीर्तनातून भक्तीचा आनंद घेतला. आषाढी एकादशीचे महत्त्व स्पष्ट करताना उपवासाचे आणि त्यातील पदार्थांचे महत्त्व सांगितले या निमित्ताने मुलांना आपल्या परंपरेचे, सामाजिक समतेचे आणि संतांच्या महानतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. आध्यात्मिक प्रगती आणि आत्मचिंतनासाठी या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शैक्षणिक वातावरणात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, हा या कार्यक्रमाचा एक उद्देश होता. फर्स्ट स्टेप प्री प्रायमरी स्कूल मध्ये आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व अनुभवले. दिनांक 5 जुलै 2025 वार शनिवार रोजी सकाळी 9 ते 12 च्या वेळेत संपन्न झाला झाला

# सेवानिवृत्त शिक्षकांचा वृक्ष अभ्यास दौरा



दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे

भंडारा -गुडमॉर्निंग ग्रुप तर्फे उकारा फाट्या जवळ शिव मंदिर परिसरात व निसर्ग रम्य वातावरणावर विविध जातीचे झाडे असलेल्या ठिकाणी अभ्यास भेट दौरा करण्यात आला .त्यामध्ये विविध जातीचे झाडांना भेट देण्यात आली. विविध प्रकारचे झाडे त्यांचे गुणधर्म काय ? त्यांना कोणत्या प्रकारचे फळे येतात या गोष्टींच्या एकमेका कार्यकर्त्यांमध्ये चर्चा करण्यात आली व त्याचा औषधी गुणधर्म काय ही वनस्पती आपल्या कोणत्या रोगावर चालेल त्याच्या आपल्या दैनंदिन जीवनामध्ये काय उपयोग आहेत कोणत्या झाडाला कोणते फळे येतात या सर्व गोष्टीच्या चर्चा करण्यात आली . या प्रसंगी गुड मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष डी इ रामटेके, मनोहर मस्के, दूधराम भुरे,सामाजिक कार्यकर्ते डी जी रंगारी, डी ए मारवडे , अरुण चव्हाण, व्ही एम देवगिरकर , सेवानिवृत्त पीएसआय सांदेकर, प्राध्यापक नरेंद्र डहरवाल, सुभेदार मेजर मुनेश्वर, सेवानिवृत्त अधीक्षक न्याय विभाग वामन कापगते, एम डी नारनवरे, अशोक रंगारी, ताराचंद धकाते, डॉ .जितेंद्रकुमार ठाकूर, हिरालाल पारधीकर , प्रफुल्ल सूर्यवंशी व इतर गुड मॉर्निंग ग्रुपचे कार्यकर्त्या उपस्थित होते.

# गुहागर तालुका कुणबी महिला मंडळाची नूतन कार्यकारणी जाहीर

दैनिक युवक आधार
मुंबई :- (प्रमोद तरळ)

कुणबी समाजोन्नती संघ शाखा तालुका गुहागर मुंबई, संलग्न नवनिर्वाचित कुणबी महिला मंडळ यांची सन २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी महिला कार्यकारणी पदाधिकारी निवड शनिवार दि. २८ जून २०२५ रोजी, सायंकाळी ६.३० वाजता, कुणबी ज्ञाती गृह,(वाघे हॉल) परेल मुंबई येथे तालुका शाखा अध्यक्ष अनंत मालप यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संघ सरचिटणीस कृष्णा वणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सभेला सरचिटणीस वसंत कावणकर यांनी सुरुवात करून निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी कुणबी महिला मंडळ तालुका गुहागर कार्यकारिणी सन २०२४-२५ ते २०२८-२९ पुढील प्रमाणे निवडण्यात आली. अध्यक्षा: प्राजक्ता सुभाष गोताड - हेदवी गट,उपाध्यक्षा: वैशाली तरुण भोगले - गुहागर गट,वेदांती प्रमोद गावडे - पालशेत गट, तन्वी आश्विन पागडे - तवसाळ गट,नीलिमा अनंत सोलकर - हेदवी गट, सरचिटणीस: सान्वी सचिन मोरे - हेदवी गट,
सहचिटणीस: प्रिया निलेश ठोंबरे - तवसाळ गट,प्रिया भालचंद्र धनावडे - हेदवी गट,पूजा दिनेश सोलकर- पालशेत गट, अनुष्का अजय आग्रे - गुहागर गट, खजिनदार: मितिका कीर्तीकुमार वणे-हेदवी गट आदींची निवड झाली आली आहे नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे

# उत्कृष्ट कार्याबद्दल लघु वृत्तपत्रांच्या वतीने शासकीय अधिकारी व समाजसेवकांचा सत्कार

दैनिक युवक आधार
वाशिम वार्ताहर

आकांक्षीत. रिसोड प्रतिनिधी रणजितसिंह ठाकूर.... जिल्ह्यात विकासाची गंगा वाहती ठेवण्यासाठी झटणाऱ्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस., जिल्हयातील आरोग्य सेवेला राज्यात क्रमांक एकचा दर्जा देणारे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे व समाजसेवेत आपले संपूर्ण जीवन खर्ची घालणारे समाजसेवक निलेश सोमाणी यांचा लघु वृत्तपत्रांच्या वतीने शुक्रवार, ४ जुलै रोजी त्यांच्या कार्यालयात भावपूर्ण सत्कार करण्यात आला.




जिल्ह्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांच्या नेतृत्वात ४० दिवसात ४० हजार जलतारा निर्मिती करून जिल्ह्याने भूजल पुनर्भरणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. या कामगिरीची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद करण्यात आली आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांचा तसेच तळागाळातील लोकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळवून देण्यासह आरोग्य सेवेला राज्यात सन्मानाचे नवे आयाम देणारे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्यासह गोरगरीबांच्या मदतीसाठी सदैव धावून जाणारे व मुक्या प्राण्यांच्या सेवेसाठी तत्पर असणारे चैतन्याचे उर्जास्त्रोत, गोरक्षक, संवेदनशिल पत्रकार व विविध शासकीय पुरस्काराने सन्मानित झालेले सामाजीक कार्य

# चिपळूण तालुका बौद्धजन हितसंरक्षक समिती, चिपळूण आयोजित भव्य विद्यार्थी गुणगौरव सत्कार सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार

चिपळूण:- (प्रमोद तरळ) शेवटच्या बाकावर बसलेल्या विद्यार्थ्याला पुढच्या पहिल्या दुसऱ्या बाकावर बसलेल्या विद्यार्थ्याने हलक्यात घेऊ नये. कारण या दोघांपैकी त्याचा स्वतःवर पूर्णतःआत्मविश्वास असतो आणि हेच त्याच्या यशाचे गमक असते. करिअर हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीवर आणि निवडीवर अवलंबून असते असे प्रतिपादन सह्याद्री पॉलिटेक्निकल सावर्डे (चिपळूण) येथे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर दिनेश खानविलकर यांनी केले.

चिपळूण तालुका बौद्धजन हितसंरक्षक समिती, चिपळूण आणि शिक्षण समिती यांच्या वतीने इयत्ता दहावी, बारावी, पदवी व पदवीत्तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा येथील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवनात पार पडला. यावेळी सुमारे 100 हून




अधिक विद्यार्थ्यांचा ,पदवीधरांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना संबोधित करताना दिनेश खानविलकर पुढे म्हणाले. आज विविध प्रकारातील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे अनेक पर्याय तसेच शासनाच्या हितोपयोगी शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध आहेत. म्हणून कोणत्याही शाखेतल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणापासून वंचित राहू नये. पुढे त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तक वाचनांचे संदर्भ देताना प्रगल्भ बुद्धिमत्तेचे आणि अथक परिश्रमाचे जागतिक किर्तीचा बहुमान प्राप्त झालेले लिखित संविधान हे भारताला कसे भूषणवह ठरले आहे. यावर आपले विचार व्यक्त करून सभागृहाला मंत्रमुग्ध केले. सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत सावंत यांच्या अधिपत्याखाली संपन्न झाला. स्वागताध्यस्थानी शिक्षण समितीचे अध्यक्ष विलास सकपाळ होते. विचारपीठावर शिवसेना शहर प्रमुख उमेश सकपाळ , कपिल शिर्के, उपाध्यक्ष नाना सावंत, सहचिटणीस तुकाराम सकपाळ, प्रमोद कांबळे, धम्म कमिटीचे अध्यक्ष मनोहर कदम, न्यायदान कमिटीचे अध्यक्ष आनंद सकपाळ, माजी उपाध्यक्ष, साहित्यिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय , चिपळूणचे अध्यक्ष राष्ट्रपाल सावंत, प्राध्यापक संसारे , मुंबईचे सरचिटणीस मंगेश जाधव, अनंत जाधव , श्रीधर जाधव, मनिष मोहिते आदींची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

या भव्य दिव्य कार्यक्रमाकरिता चिपळूण तालुक्यातील बौद्धजन हितसंरक्षक समिती, चिपळूण या मातृसंस्थेतील ग्रामीण विभागातील अनेक गावातील पदाधिकाऱ्यांनी ,सदस्यांनी, कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शवली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सरचिटणीस , युवा पत्रकार संदेश पवार यांनी केले विद्यार्थ्यांमधील उत्साह आणि पालकांच्या चेहऱ्यावरील समाधान या कार्यक्रमाची जणू पोचपावती होती. पुढील वर्षी या वर्षाच्या गुणापेक्षा अधिकाधिक कोण आपल्याला कसे प्राप्त होतील. या समवेत कॉलेज प्रवेशासंबंधी आणि करिअर संबंधित विषयाची चर्चा होती. या आनंदमय सोहळ्याला या संस्थेचे माजी चिटणीस रमाकांत सकपाळ, सामाजिक कार्यकर्ते राजू जाधव, राजहंस पतसंस्थेचे संचालक सुनील गमरे, कुटरे विभागाचे अध्यक्ष प्रकाश कदम ,२७ गाव विभागाचे अध्यक्ष सुधाकर पवार, सावर्डे विभागाचे अध्यक्ष काशिराम कदम गुरुजी, वहाळ विभागाचे अध्यक्ष अरुण पवार, यशसिद्धी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुभेदार भाऊ पवार, निवृत्त शासकीय अधिकारी अरुण जाधव, माजी मुख्याध्यापक संजय मोहिते, युवा मुख्याध्यापक रोहित जाधव, बौद्धाचार्य प्रभाकर सकपाळ, आरपीआय (आठवले गट) तालुकाध्यक्ष प्रशांत मोहिते, भिले गावचे उपसरपंच उमेश सकपाळ व मातोश्री लक्ष्मीबाई कदम स्मृती मंच, खेरशेत या संस्थेचे मुख्य प्रवर्तक संजय शांताराम कदम तसेच चिपळूण तालुक्यातील ग्रामीण संघटनेचे कार्यकर्ते, मान्यवरांनी उपस्थित दर्शवून कार्यक्रमाला शोभा आणली.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## महाविद्यालयात विठ्ठल नामाची शाळा

# दिंडी व सांस्कृतिक कार्यक्रमातून आषाढी एकादशी उत्साहात साजरी

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

सिल्लोड :- तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून, विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषात, टाळ-मृदुंगाच्या गजरात प्रभातफेरी काढण्यात आली . प्रभातफेरी सोबतच, शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम, कीर्तन, भजन, तसेच आषाढी एकादशीचे महत्व विषद करणारे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज अशा विविध संतांच्या वेशभूषा परिधान केल्या. टाळ, मृदुंग, चिपळ्या, वीणा अशा पारंपरिक वाद्यांचा वापर करून विठ्ठल, ज्ञानोबा-तुकाराम अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

तर प्रतीक्षा गव्हाणे, प्राची लोखंडे, सुदिक्षा गव्हाणे, वैष्णवी सपकाळ, ऋतुजा पंडित, पूजा सपकाळ, शिल्पा दांडगे, संस्कृती गव्हाणे, ऋतुजा पंडित, चेतन तुपे, प्रतीक्षा गव्हाणे, जयश्री सपकाळ, शिवानी लोखंडे भक्तीगीते सादर केली तर श्रावणी हिवाळे, कोमल लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. त्यांना महादेवी ठवरे, ,जयश्री चापे यांचे मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी ह भ प भगवान महाराज जंजाळ यांचे संतकृपा वारकरी गुरुकुल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिंचपूर सहकार्य लाभले. तर चेतन धुपे, कृष्णा जंजाळ, मंगेश राकडे, मंगेश गायकवाड, कार्तिक जंजाळ, कार्तिक लांडगे, मुक्ता जंजाळ या विद्यार्थ्यांनी विठ्ठलावर आधारित कीर्तन व भजनांचे सादरीकरण केले.

विद्यार्थ्यासोबत गावकऱ्यांनी सुद्धा फुगड्या खेळल्या, तर ज्येष्ठ नागरिक जिजाई काटकर अंगणात माझ्या खेळू नको नंदलाला रे भजन सादर केले.

प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांनी आषाढी एकादशीचे महत्व व वारकरी संप्रदायाची माहिती आपल्या व्याख्यानात सांगितली आणि गरुडाचे पायी हे भजन सादर केले.

विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, राजेश ठोंबरे, सुनील तांबे, योगेश निंभोरे, प्रफुल्ल कळम, कृष्णा



पाटील, सुनील सागरे, भास्कर केरले, गजानन सपकाळ, डॉ रमेश काळे, संजय जाधव, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले

# शिवसंकल्प समलोचक असोसिएशन, उरण ची वार्षिक सभा संपन्न

दैनिक युवक आधार
हेमाली प्रतिनिधी

क्रिकेट किंवा अन्य व्यासपीठावर समालोचन, निवेदन करताना मिळालेल्या मानधनातील काही रक्कम बाजूस ठेवून इयत्ता 11 वी मध्ये शिकत असलेल्या गरीब व गरजू विद्यार्थिनींना एक वर्षाच्या शैक्षणिक खर्चासाठी अर्थसहाय्य, अपंगाना व्हील चेअर, वैद्यकीय मदत अर्थसहाय्य, असे विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशन ची वार्षिक सर्वसाधारण सभा दिः 02 जुलै.2025 रोजी रात्री 08.00 वाजता असोसिएशन चे सचिव सुनिल वर्तक यांच्या निवासस्थानी पार पडली, सदर सभेस 19 सदस्य उपस्थित होते, पावसाअभावी सभा थोडी उशिरा सुरू झाली. या सभेला सुरुवात होण्याआधी कॉफी, बिस्कीट आणि उकडलेल्या भुईशेंगांचा आस्वाद सर्व पदाधिकाऱ्यांनी घेतला. सभेच्या सुरुवातीस सचिवांनी उपस्थितांचे



स्वागत करून असोसिएशन च्या गेल्या वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेऊन त्यासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्तिमत्वाचा खुलासा करून त्यांचे आभार मानले.. असोसिएशन चे खजिनदार श्री. जीवन डाकी यांनी मागील वर्षातील जमाखर्च वाचन केले, त्याला सर्वानुमते मंजुरी मिळाली. अजेंडा विषयानुसार शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी दानशूर व्यक्तिमत्वाच्या भेटी संदर्भात अध्यक्ष श्री. नितेश पंडित यांनी काही व्यक्तींच्या नावाचा उल्लेख करून सर्वांना सोबत घेऊन त्यांच्या भेटी घेऊन त्यांना असोसिएशन चे मागील सामाजिक कार्य आणि भविष्यातील संकल्पित योजना समजावून त्यांना असोसिएशन साठी मदतीचे आवाहन करू असे सांगितले. नवीन उपक्रमाबाबत काय व कोणते उपक्रम असावेत, या बाबतीत खुली चर्चा झाली. चर्चेत सदस्य देव डाकी, दर्शना माळी, विद्याधर गावंड, राजेंद्र भगत, पप्पू सूर्यराव, हेमाली म्हात्रे, स्वप्निल पाटील, यांच्यासह बहुतेकांनी आपापली मते मांडली, शेवटी विद्याधर गावंड यांनी त्यांच्या शाळेस ब्ल्यू टूथ स्पीकर देण्याची संकल्पना मांडली, त्यास चर्चेअंती सर्वानुमते मंजुरी मिळाली.

समाजातील गरजू आणि गरीब व्यक्ती भेटली तर त्यांना असोसिएशन तर्फे मदत करण्याचे आव्हान केले.त्याचप्रमाणे त्या व्यक्तीची शहानिशा करून त्यांना सहाय्य केले जाईल, असे अध्यक्ष श्री. नितेश पंडित यांनी सांगितले. पुढील विषयानुसार असोसिएशन ची ट्रिप व्हावी, या बाबतीत सर्वांनी आपापली मते मांडून एक दिवसाची वर्षा सहल काढण्याचे ठरले,

असोसिएशन ला या वर्षीही जर्सी साठी एक स्पॉन्सर तयार असल्याचे सचिव सुनिल वर्तक यांनी सांगितले. तळ्यातील ताजे मासे, चिकन, मटण, तांदळाची भाकरी इ. नी या उपस्थित तृप्त झाले. अशा प्रकारे शाकाहारी, मांसाहारी भोजनाचा आस्वाद घेऊन गप्पा गोष्टी अंती सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

# उमटे धरणातील गाळ काढण्यास खूप विलंब; लवकरात लवकर कार्यवाही करा - आमदार प्रशांत ठाकूर

## उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू - नामदार गुलाबराव पाटील

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्यास खूप विलंब झाला आहे त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्यांना कायम सामोरे जावू लागू नये, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता. त्या अनुषंगाने चौथ्यांदा निविदा प्रसिद्ध करून निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू असल्याचे लेखी उत्तर राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

अलिबाग तालुक्यातील उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी ८ कोटी ८१ लाख ३५ हजार ६३१ इतक्या रकमेची ई-निविदा प्रसिद्ध होऊन बराच कालावधी होऊन सुद्धा अद्यापही धरणातील गाळ काढण्यासाठी विलंब होत असल्याचे मे २०२५ मध्ये निदर्शनास आले, आहे. या धरणाचा गाळ काढल्यास जवळपास ४६ गावे व ३३ आदिवासी वाडयांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असून संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे धरणातील गाळ काढण्यासाठी तीन वेळा निविदा व सूचना प्रसिद्ध करूनही धरणाचा गाळ काढण्यास विलंब होत असल्यामुळे गावांना व आदिवासी वाडयांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे, त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून ४६ गावे व ३३ आदिवासी वाडयांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी उमटे धरणातील गाळ काढण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दाखल केला होता. या प्रश्नावर राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, उमटे धरणातील गाळ काढण्यास विलंब होत असल्याची बाब खरी असून सदर कामासाठी तीन वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नाही. सदर कामाकरीता पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू आहे. उमटे धरण हे उमटे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचा उद्‌भव आहे. उमटे धरणातील गाळ काढल्यानंतर उमटे धरणाची पाणी साठवण क्षमता वाढणार आहे. त्यामुळे योजनेतील समाविष्ट गावे, वाड्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. सदर कामाची निविदा तीन वेळा प्रसिध्द करण्यात आली होती, त्यास प्रतिसाद प्राप्त झाला नाही. पुन्हा चौथ्यांदा निविदा प्रसिध्द करून निविदा मंजुरीबाबत अंतिम कार्यवाही सुरू आहे. तसेच उमटे धरणातून सदर गावांना व वाड्यांना पाण्याचा पुरवठा सुरू आहे, अशीही माहिती नामदार गुलाबराव पाटील

# ज्येष्ठ नागरिक संघ, चिपळूणचा मासिक स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

दैनिक युवक आधार
चिपळूण वार्ताहर

ज्येष्ठ नागरिक संघ, चिपळूणचा जून महिन्यातील स्नेहमेळावा संघाच्या कार्यालयात संघाच्या सचिव रत्नमाला



कळंबटे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला.यावेळी मंचावर कोषाध्यक्ष विजय बापट, सदस्य नंदकुमार तांबे उपस्थित होते.

प्रथम रत्नमाला कळंबटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विजय बापट यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर जून महिन्यात वाढदिवस असलेल्या उपस्थित सभासदांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे औक्षण करून आणि नंतर केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. ही जबाबदारी सौ.नीला पेंडसे, मंजिरी नरवणे, अंजली गोंधळेकर, विद्या गोडबोले यांनी व्यवस्थित पार पाडली.विलास चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुभाष वाणी यांनी पुरुषांचा उखाणा सादर केला. सुनील वाडेकर यांनी गुंतवणुकी बाबत माहिती दिली. शंकर माने यांनी साजऱ्या झालेल्या वाढदिवसांविषयी स्वरचित कविता सादर केली.माधवी भागवत,अपर्णा कांबळे,विजयालक्ष्मी भोसले यांनी गीते सादर केली.

कार्यक्रमाला ७५ सभासद उपस्थित होते. सुप्रिया बापट यांनी खवा बर्फीचा खाऊ दिला. प्रभाकर बुटाला, विजया मनोरकर, इमाम म्हमदुले, प्रभाकर देवळेकर, शंकर माने, केशव शिंदे, महादेव चिले, यशवंत कदम, विलास चव्हाण, महादेव गराटे, मंगला देवळेकर, सइदा शेखदारे, संध्या भाटिया, श्रीकांत पागार, अलका बनसोडे, सुप्रिया बापट यांनी संघाला देणगी दिली.

शेवटी अल्पोपहार होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उदय वेल्हाळ, लक्ष्मण कांबळे,मधुकर तेरेदेसाई यांनी उत्तम सहकार्य केले.

# हेल्पिंग हँड्सच्या उपक्रमातून कोळकेवाडी परिसरातील ४८ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट वाटप

दैनिक युवक आधार

चिपळूण (प्रतिनिधी): चिपळूण तालुक्यातील कोळकेवाडी परिसरातील दुर्गम भागातील गरजू, गरीब व हुशार विद्यार्थ्यांसाठी 'हेल्पिंग हँड्स, मुंबई' या सामाजिक संस्थेच्या वतीने शैक्षणिक किट वाटप उपक्रम राबवण्यात आला. जिल्हा परिषद शाळा पेढांबे भराडी वाडी येथे आयोजित कार्यक्रमात एकूण ४८ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. श्री. संतोष ठोंबरे (प्रमुख, हेल्पिंग हँड्स, मुंबई) यांच्या नेतृत्वाखाली व श्री. देवराव शिसोदे यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात मदतीचा हात देत, दप्तर, वह्या, चित्रकला वही, रंगपेन, पेन, पेन्सिल, रबर, शॉपनर, कंपास बॉक्स, पाणी बाटली, छत्री, सॅन्डल यांचा समावेश असलेल्या किटचे वाटप करण्यात आले. याशिवाय स्वच्छतेसाठी साबण, टूथब्रश, टूथपेस्ट आणि नीलकटर साहित्य देखील देण्यात आले. या उपक्रमात पेढांबे गावच्या नवनिर्वाचित सरपंच मा. सौ. विजयाताई पेढांबकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, शिक्षणप्रेमी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाच्या आयोजन व यशस्वीतेसाठी श्री. सुनील उबळेकर सर, श्री. विजय शिंदे सर, सौ. सुर्वे मॅडम, सौ. मोरे मॅडम, श्री. यादव सर, सौ. उबळेकर मॅडम व श्री. योगेश कदम सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा आणि त्यांचे शिक्षण सुकर करणारा हा उपक्रम सर्वत्र कौतुकास्पद ठरला आहे. हेल्पिंग हँड्सच्या या सामाजिक भानाने भरलेल्या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांनी मनःपूर्वक स्वागत केले.



# व्हि. पी. के. उद्योग समूहाच्या वतीने ऊस पीक स्पर्धेत शेतकऱ्यास बुलेट भेट व एम. व्ही. के .ॲग्रो साखर कारखाना वाघलवाडा चे रोलर पूजन कार्यक्रम संपन्न

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

नांदेड - उमरी तालुका तालुक्यातील कुसुमनगर वाघलवाडा कारखाना येथे कार्यक्रमाचे आयोजन करुन भव्य दिव्य व्हि पी के उद्योग समूहाच्या वतीने ऊस लागवड हंगाम 2023-024 मध्ये उच्चांकी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ऊस पीक स्पर्धेचे आयोजन केले होते त्या स्पर्धेत मौजे सिंधी ता.उमरी येथील प्रगतिशील शेतकरी श्री बालाजी सदाशिव शिंदे यांनी एकरी 91.583 मे. टन उत्पादन घेऊन स्पर्धेत प्रथम क्रमांक पारितोषिक प्राप्तीचा बहुमान मिळविला आहे. त्यांना बक्षीस वितरण करून सत्कार करण्याचा कार्यक्रम उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री मारोतराव पाटील कवळे गुरूजी, यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला सन 2023-24 या लागवड हंगामातील शेतकरी




1 एकर जमिनीवर 10001या जातीचे ऊस रोप कारखान्या तर्फे घेऊन उसाची लागवड केली. हा ऊस आडसली असून 15 ते 16 महिन्यात तोड झाल्यानंतर त्याचे एकरी 91 .583 मे. टन उसाचे उत्पन्न झाले. कवळे गुरुजी यांनी बोलल्याप्रमाणे प्रथम येणाऱ्या शेतकऱ्याला आज कुसुमनगर वाघलवाडा येथे हजारो शेतकरी बांधवाच्या उपस्थितीत बुलेट मोटारसायकल देऊन फेटा बांधून त्यांचा सन्मान करण्यात आला. गुरुजींच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील शेतकरी हा आर्थिकद्रष्ट्या सक्षम झाला पाहिजे, ह्या हेतूने गावोगावी सभा घेऊन शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतीतून ऊस पिकाचे नियोजन कसे केले पाहिजे खत मात्रा फवारणी बेसल डोसेस या गोष्टीमुळे शेतकरी हा ह्या भागात प्रगती होत असताना दिसत आहे. तसेच या कार्यक्रमात अपघाती निधन झालेल्या ऊसतोड मजूराच्या वारसांना विमा कंपनीतर्फे 3 मजूर व 1 कर्मचाऱ्यांना प्रत्येकी 3 लाख रुपयांचा धनादेश सुद्धा देण्यात आला. या कार्यक्रमाला भागातील सर्व सन्माननीय शेतकरी बांधव तसेच प्रमुख उपस्थितीत संचालक गणेशराव पाटील कवळे, सीईओ संदीप पाटील कवळे, ज्येष्ठ नेते गणपतराव पाटील हासेकर, जेष्ठ मार्गदर्शक लक्ष्मणराव पाटील हरेगावकर,मधुकर पाटील बोळसेकर,माजी सरपंच पांडुरंग पाटील वाघलवाडेकर,आनंदराव पाटील भायेगावकर, तानाजी पाटील शिंदे हरेगावकर,साईनाथ पाटील हिरडगावकर, दत्ताहरी पाटील हिवराळे शिंगणापूरकर, शंकर पाटील पुयड,सुदर्शन पाटील पुयड,पोलीस पाटील पिनलवार साहेब,मारोतराव किन्हेवाड, युवा उद्योजक प्रकाश पाटील नरवाडे,प्रगतिशील शेतकरी बालाजी पाटील शिंदे बोळसेकर, विठ्ठलराव पाटील फुलारी गोरठेकर,ओम पाटील कवळे सिंधीकर, बालाजी पाटील इज्जतगावकर,श्रीनिवास पाटील ढगे इज्जतगावकर,नागोराव पाटील हिवराळे,आकाश पाटील कवळे, विश्वनाथ पाटील कुदळेकर, यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते सदरील कार्यक्रमाचे प्रस्तविक कारख्यान्याचे जनरल मॅनेजर एस. जी आंबटवार, यांनी केले, सूत्रसंचालन बाबुरावजी भोसले तर नियोजन व आभार श्री यु.जी कदम जनसंपर्क अधिकारी, यांनी मांडले या कार्यक्रमास कारखान्याचे अधिकारी चीफ इंजिनिअर येनडाळे साहेब,प्रोसेस मॅनेजर अमृते साहेब,टीजीएम श्री दुधाटे साहेब,मुख्य शेतकी अधिकारी प्रकाशजी पवार, शेतकी अधिकारी शेख रफिक साहेब, ऊस विकास अधिकारी श्री पडवळे साहेब,ऊस विकास अधिकारी साईनाथजी सावंत, चिफ अकाउंटंट संजयजी भिसे साहेब,कार्यालयातील अधीक्षक श्रीकांत कदम,चीफ इंजिनिअर श्री वाडियार साहेब, ऊस पुरवठा अधिकारी श्री वाघ साहेब, उमाटे साहेब, विभागातील सर्व फिल्ड ऑफिसर कर्मचारी कामगार आधी जण उपस्थित होते अशा पद्धतीने ऊस विकास उत्पन्न कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाला

# ''"महाराष्ट्र स्वीट्स" दुकानाचे द्रोणागिरी नोड मध्ये आमदार महेश बालदी यांच्या शुभहस्ते शानदार उद्घाटन.

## "1977 पासून उरणकरांची गोडी आता द्रोणागिरीत"

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर उरण हे मुंबई च्या हाकेच्या अंतरावर वसलेले शहर आहे. इथे आगरी , कोळी व कराडी समाजा सोबतच इतर समाजाची ही लोकवस्ती आहे. उरण हे उरण व उरण तालुक्यातील गावांना व्यावसायिक दृष्टीने व बाजारपेठ, खरेदीसाठी महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे उरण मध्ये व्यावसायिक दुकाने मोठ्या प्रमाणात आहेत. याशिवाय केंद्र व राज्य सरकारचे महत्त्वाचे प्रकल्प उरण मध्ये असल्याने उरण हे व्यापारासाठी महत्त्वाचे केंद्र आहे.

उरण मध्ये साधारण १९७७ साली म्हणजे गेली चार दशकाहून अधिक दशके सुमारे ४८ वर्षापुर्वीपासून उरण च्या मुख्य बाजारपेठेत भगवान सेवक, गणेश सेवक व सोहन सेवक या बंधूनी "महाराष्ट्र स्वीट्स" नावाने मिठाई चे दुकान उघडले. या दुकानात फ्रेश आणि स्वादिष्ट, सर्व प्रकारची मिठाई मिळते.येथे मिळणाऱ्या मिठाई ची कोणत्याही प्रकारची कधीही तक्रार आलेली नाही. आणि दुकानाची सेवा हि चांगल्या प्रकारची आहे.

आणि आता शुक्रवार दिनांक ४ जूलै रोजी ग्राहकांच्या पसंतीस उतरणारे विश्वसनीय व सुप्रसिद्ध"



महाराष्ट्र स्वीट्स "शॉपचे उद्घाटन शॉप नंबर ६,देवसखा बिल्डिंग, द्रोणागिरी सेक्टर ५०, द्रोणागिरी नोड येथे उरण चे दमदार आमदार मा. महेश बालदी यांच्या शुभहस्ते दुकानाचे उद्घाटन झाले. आलेल्या मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले, मान्यवरांमध्ये मिलिंद पाडगावकर, रमेश ठाकूर, हेमंत शहा, कौशिक शहा, चंद्रकांत घरत, तन्सुख जैन, सुनील पेडणेकर त्याचबरोबर उरण मधील प्रसिद्ध व्यापारी, द्रोणागिरी रहिवासी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

या दुकानाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे समोसे, कचोरी, वडापाव पाणीपुरी, सॅंडवीच, डोसा, फरसाण, स्पेशल केसर पेढा, मलाई बर्फी, कलाकंद बर्फी, डायफ्रुट बर्फी, काजूकत्री इत्यादी पदार्थांची विशेषतः आहे. सकाळी आठ ते रात्री दहा वाजेपर्यंत हे दुकान ग्राहकांसाठी उघडे असते. येथे असणाऱ्या लोकांची ग्राहकांसाठी उत्तम प्रकारे सेवा आहे. त्यामुळे दिवसेंदिवस मिठाई, नाष्टा घेण्यासाठी या दुकानाला ग्राहक जास्तीत जास्त पसंती देत आहेत. उद्घाटनाच्या दिवशी दिवसभर येणाऱ्या ग्राहकांचे हसतमुखाने स्वागत करण्यात येत होते. आणि प्रत्येक येणाऱ्या पाहुण्यांना स, ग्राहकांना मोफत नाष्टा दिला. सकाळपासून ते रात्री पर्यंत माणसांची मोठ्या संख्येने रेलचेल चालू होती. येणाऱ्या प्रत्येकाशी गोड बोलून व गोड देऊन स्वागत करण्यात येत होते.महाराष्ट्र स्वीट्स मधून ग्राहकांना ऑर्डर करायची असेल तर संपर्क क्रमांक. ८१६९१५५०३७ या क्रमांकावर संपर्क साधा.

# प्राचार्य केशव भांगे साहेबांचा भव्य नागरी सत्कार

दैनिक युवक आधार
शिरूर कासार - प्रतिनीधी
शिरूर कासार येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बदली होऊन आलेले सन्माननीय मुख्याध्यापक तथा प्राचार्य मा. केशव भांगे साहेब यांचे शिरूर कासार व पंचक्रोशीतील विविध मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक, जेष्ठ कार्यकर्ते यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला आहे. आदर्श शिक्षण संस्था बीड' चे सचिव तथा माजी कॅबीनेट मंत्री मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांनी स्वतः शिरूर (का.) कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे संस्थेतील सर्वात मोठे युनीट असल्या कारणाने प्राचार्य केशव भांगे साहेब हे सक्षम,धराडीचे व तरूणतडफदार व्यक्तीमत्त्व अशी ओळख असल्यामुळे प्राचार्य केशव भांगे साहेबांवर शिरूर (का.) येथील कालिकादेवी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाची जबाबदारी टाकली आहे. यामुळे मा.अण्णासाहेबांच्या या निर्णनयाचे सर्वत्र कौतुक होत असून नव्याने रूजु झालेले. प्राचार्य केशव भांगे साहेब यांचा अनेकविध मान्यवरांच्या वतीने स्वागत व सत्कार होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीचे शिरूर




(का.) तालुका अध्यक्ष सुरेश (अप्पा) उगलमुगले, नगरसेवक गणेश तळेकर, मा.प्रताप कातकडे, मा.अरविंद फरताडे, मा.अजय कुचेरिया, मा.अजिनाथ धोत्रे तसेच नगरपंचायतचे गटनेते गणेश भांडेकर, नगरसेवक वसंतराव काटे, मा.अर्जूनकाका गाडेकर, मा.सावता कातकडे, मा.अमोल चव्हाण, मा.सभापतीचे प्रतिनिधी प्रा.अक्षय रणखांब, युवा नेते सागर केदार, मा.अंकुश नागरगोजे, मा.प्रकाश ढगे, मा.नवनाथ मिसाळ, प्रमाणे रायमोहचे सरपंच मा.सुभाष (काका) क्षीरसागर, पाडळीचे माजी सरपंच रामदासजी हांगे, शिरूर पंचायत समिती सभापतीचे प्रतिनिधी मा.विजयदादा सरवदे, मा. प्रकाश इंगळे, मा.किरण चव्हाण,मा. अण्णासाहेब राऊत, मा.भारत बहिर, मा.प्रभाकर सानप तसेच परिसरातील अनेक मान्यवरांनी प्राचार्य केशव भांगे साहेबांचा भव्य असा नागरी सत्कार केला आहे. या प्रसंगी विद्यालयातील,उपप्राचार्य देशमाने सर,पर्यवेक्षक जनार्दन काळे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, व सर्व प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,मोठ्या संखेने उपस्थित होते.

# केळवणे को.ए.सो. हायस्कूल शालेय वारकरी दिंडीच्या आयोजनाला विद्यार्थ्यांचा पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर
उरण तालुक्यातील केळवणे गावात अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठू माऊली यांच्या भक्तीरसाचा सर्वात मोठा सोहळा आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांची दिंडी पंढपुराकडे मजल-दरमजल करीत निघालेली असून ६ तारखेला भव्य दिव्य असा विठ्ठल भक्तीचा सोहळा रंगणार आहे. महाराष्ट्रातील विविध शाळांमध्येही विद्यार्थ्यांमध्ये संस्कार आणि परंपरेची जाणीव व्हावी म्हणून दिंडीचे आयोजन केले जाते , उरण तालुक्यातील केळवणे गावातील को. ए.सो. शाळेत शनिवार, ५ जुलै रोजी साक्षात पंढरी अवतरली असून यात सुमारे ३०० हून अधिक शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते.
महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांचे महान कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, त्यांच्या परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव नव्या पिढीत रुजावी, यासाठी शाळा व्यवस्थापन आणि शिक्षक वर्ग यांच्या विद्यमाने या शालेय वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी सकाळी ७ वाजता विद्यार्थ्यांच्या पारंपारिक वारकरी वेशभूषेतील ही दिंडी विठ्ठल नामाचा जयघोष करीत पावित्र्य आणि मांगल्याचे भान ठेवून शिस्तबद्ध पद्धतीने शाळेतून सुरू होऊन संपूर्ण गावातून विठ्ठल , ज्ञानेश्वर अशा विविध मंदिरांना भेट देऊन मराठी भाषा, संस्कृती, परंपरा याचा जागर केला .
सर्व विद्यार्थ्यांनी या दिंडीमध्ये उत्स्फूर्तपणे व आनंदाने भाग घेतला होता त्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह व आनंद ओसंडून वाहत होता.






# उपविभाग प्रमुख दीपेश पाटील यांनी केली खराब रस्त्याची पाहणी

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी कल्याण ग्रामिण / रमेश राऊत
ठाणे, दि.६:-दिवा प्रभाग समितीच्या अंतर्गत असलेल्या शिळ- देसाई विभागातील अभय नगर येथे बऱ्याच दिवसापासून रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था झाली आहे. येथे चालू असलेल्या बुलेट ट्रेनच्या कामामुळे येथून बऱ्याच प्रमाणात खडी,माती आणि इतर सामानांच्या लोडिंग गाड्या ये जा करतात. हा दाट लोकवस्तीचा भाग असून येथून या लोडिंग गाड्यांमुळे येथून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना तसेच शाळकरी मुलांना भरपूर त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार तक्रार करून सुद्धा बुलेट ट्रेनचे कुठलेही अधिकारी या रस्त्याकडे लक्ष देत नव्हते, अभय नगर वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष घनश्याम पाटील आणि सचिव रमेश राऊत यांनी वारंवार मिटिंग घेऊन बुलेट ट्रेनच्या होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला बुलेट ट्रेनचे अधिकारी



कुठल्याच प्रकारचे सहकार्य केले नाही.

अभय नगर येथील रहिवासी दैनिक युवक आधारचे पत्रकार आणि अभय नगर वेल्फेअर सोसायटीचे सचिव रमेश राऊत आणि त्यांचे सहकारी यांनी मिळून शिवसेना शिंदे गटाचे उपविभाग प्रमुख दीपेश पाटील यांच्याकडे याबद्दल तक्रार करून दाखल घेण्याची विनंती केली. उपविभाग प्रमुख दीपेश पाटील यांनी त्वरित विनंतीची दखल घेऊन अभय नगर मध्ये येऊन रस्त्याची पाहणी केली आणि लवकरात लवकर रोडची दुरुस्ती करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांच्यासोबत श्री. बाबुराव पाटील हे सुद्धा उपस्थित होते. आश्वासन फक्त आश्वासनच न राहता त्याचे रूपांतर कामात होऊन लवकरात लवकर रस्त्याची दुरुस्ती व्हावी अशी मागणी अभय नगर मधील सर्व रहिवाशांनी उपविभाग प्रमुख दीपेश पाटील आणि श्री. बाबुराव पाटील यांच्याकडे केली आहे.

## म मराठी ..

आता समस्त लावती
सन्माने मराठी पाटी
अभिजात दर्जा दिला
कुंकूमतिलक ललाटी

नावउच्चारता मराठी
ना कपाळाला आठी
शिकूनपहावी नक्की
अमृता समान मराठी

आम्ही कर्मठभाषीक
काढत होता सालटी
कळता दर्जा भाषेचा
आता मारालं पलटी

नाक मुरडणे सोप्पे
बदलेलं अंधूक दृष्टी
सर्व भाषांना द्या मान
कुणी ना व्हावे कष्टी

रामदास भक्त आम्ही
देऊ गरजेला लंगोटी
नाठाळांच्या मस्तकां
उन्मादां कपाळकाठी

अभिजात दर्जा मिळे
सरल्या सगळ्या त्रुटी
सिंहासनारूढ मराठी
आश्चर्ये ताठी भृकुटी

प्रतिक्षेची होई संतुष्टी
उत्सव चाले महाराष्ट्री
सन्मान पंगतीत भोज
नको चिवडायला उष्टी

- हेमंत मुसरीफ पुणे.

==============

## अनंतानंद ..

पाय धावे झपाझपा
अगा आलो पंढरपुरी
कळलेनाही खरोखरी
वारी कशी झाली पुरी

वादळी वारे भिरभिरे
बरसल्या मध्येचं सरी
शरीरां असंख्य व्याधी
थकल्या वेदना विसरी

करावी वारी एक तरी
इच्छा होती ती अंतरी
भेटेलं लाडका श्रीहरी
सुख दिलेसं तू निरंतरी

कठीण रस्ता सुखकरी
पदोपदी हरी रे सावरी
अगोचररूपे पंढरीनाथ
सभोवती सतत वावरी

गळूनपडे पातके सारी
पोचे चंद्रभागेच्या तिरी
अमृतात अभ्यंग स्नान
तूचं नेणार गा पैलतिरी

दिसली नामदेवपायरी
जाणली माझी पायरी
आत्मा भेटे परमात्म्या
जोडता तुझशी सोयरी

हरि मुख समोर सुख
लोळण घेतो पायावरी
अनंतानंद अनंत देतो
स्नेहाळ कृपा जयावरी

- हेमंत मुसरीफ पुणे.

# विवाहितेची गळफास लावून आत्महत्या सासरच्या मंडळीने घातपात केल्याचा नातेवाइकांचा आरोप

दैनिक युवक आधार
उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी
दिग्रस : एका विवाहित महिलेने घरातच स्लॅबच्या हुकाला नायलॉन दोरीने गळफास लाऊन आत्महत्या केली. ही घटना ३ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजताच्यासुमारास तालुक्यातील हरसुल येथे उघडकीस आली. या प्रकरणी सासरच्या मंडळीने घातपात केल्याचा आरोप मृतक महिलेच्या नातेवाईकांनी केला आहे.सपना महादेव नेमाडे (३६) रा. हरसुल असे मृतक विवाहित महिलेचे नाव आहे. सतत तिला सासरच्या मंडळींकडून शारीरिक, मानसिक त्रास असल्याचा आरोप तिच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे. मृतक महिलेचे दिग्रस ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले आहे. शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. मृतक महिलेवर हरसुल येथील हिंदू समशान भूमीत अंत्यसंस्कार पार पाडले आहे. मृतक विवाहित महिलेचे माहेर अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील असून अंतिम संस्कार पार पडल्यावर पोलिसात तक्रार नोंदविणार असल्याचे मृतकेचा भाऊ उमेश ज्ञानेश्वर सोनुने (३५) रा. नांदगाव खंडेश्वर यांनी सांगितले. या प्रकरणी दिग्रस पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांच्या मार्गदर्शनात तपास सुरू केला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# श्री छत्रपती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये अवतरली पंढरी विठुनामात रंगले चिमुकले वारकरी



दैनिक युवक आधार
सणसर :- विकास क्षत्रिय

भवानीनगर ता.इंदापूर जि. पुणे येथील श्री छत्रपती इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शनिवारी अवतरली पंढरी,विठू नामात रंगले चिमुकले वारकरी आषाढी एकादशीचे अवचिते साधून स्कूलमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते प्रथम पालखीचे पूजन महेश पवार व इतर पालकांच्या हस्ते करण्यात आले यावेळी पालखीची आरती करण्यात आली विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थी या पालखी सोहळ्याचे मुख्य आकर्षण होते तसेच सजलेल्या फुलांनी आकर्षक पालखीसह वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी तर डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी यासह रिंगण सोहळा उत्साहात पार पडला विद्यार्थिनींनी व शिक्षिका यांनी फुगड्या खेळण्याचा आनंद लुटला ज्ञानोबा तुकाराम, विठोबा रुखमाई च्या जयघोषाने स्कूलचा परिसर दुमदुमन गेला हा पालखी सोहळा स्कूलपासून कामगार वसाहत ते बाजार पेठ अशी प्रभात फेरी काढण्यात आली.पालक वर्गाने विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षक मॅडम यांचे कौतुक केले या स्कूलमध्ये गुणवत्ते बरोबरच विविध उपक्रम राबविले जातात या उपक्रमामुळे पुन्हा भवानीनगर परिसर भक्तीमय झाला होता यावेळी विद्यार्थ्यांना स्कूलच्या वतीने खाऊवाटप करण्यात आले.हा उपक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी प्राचार्या रेश्मा मुलाणी,शिंदे एम एस,नलवडे जे डी,चोपडे डी एस,पवार एस पी, पिसाळ आर जे,सांगळे एम एल,नलवडे एस एस,सपकळ एम एम,बनकर आर डी,जाधव के एम,मदने व्ही डी,सपकळ एस ए,यांनी विध्यार्थी यांची योग्य वेशभूषा करून उपक्रम साजरा करण्यात मोठे योगदान देण्यात आले.

# ज्ञानोबा तुकारामच्या आवाजात निघाल्या दिंड्या शिरूर तालुक्यात विठ्ठल नामाचा गजर

दैनिक युवक आधार
शिरूर कासार प्रतिनिधी

आज दि. ६ रोजी रविवारी आषाढी एकादस आल्यामुळे शिरूर तालुक्यातील अनेक शाळांनी काल दिनांक पाच रोजीच गावोगाव दिंड्याचे आयोजन केले होते. वारकऱ्यांच्या पोशाखातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक आणि कर्मचारी यांनी परंपरागत फुगड्या फुगड्या खेळून प्रत्यक्ष पंढरपूरच्या दिंडीचा अनुभव घेतला.

लोणी हायस्कूल लोणी येथे आषाढी एकादशी निमित्त शाळेत श्री. विठ्ठल रुक्मिणी पुजन करुन पायी दिंडीचे आयोजन मुख्याध्यापक श्री. सस्तारे एस. व्ही. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उत्साहात सर्व
विद्यार्थी व कर्मचारी यांनी प्रत्यक्षात पंढरपुर दिंडी सारखा आंनद अनुभवला. अनेक विद्यार्थ्यांनी अभंग, गौळणी, हरिपाठ, वारकरी फुगडी या सर्वांचा आनंद अनुभवला. यावेळी विद्यार्थ्यांना कौतुकास्पद बक्षिसांचा वर्षाव झाला. शेवटी पसायदान घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी गावचे सरपंच किसनदेव बडे यांचीही उपस्थिती होती.

शिरूर शहरातही डीजेच्या तालावर पालखीची मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी सर्व विद्यार्थी पंढरपूरच्या वारीच्या दर्शनाला खरेच निघाले आहेत की काय असे वाटत होते.



शिरूर कासार तालुक्यातील गोमळवाडा येथेही मुख्याध्यापक सुनील फुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी गावापासून म्हसोबा मंदिरापर्यंत दिंडीचे आयोजन केले होते. त्यांना साथ गावातील न्यू इंग्लिश स्कूल गोमळवाडा या शाळेतील मुख्याध्यापक जरांगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विद्यार्थिनी आणि सर्व शिक्षक यांनी दिंडीत सहभाग घेऊन सहकार्य केले.

# जुलै अखेरपासून बीई 6 आणि एक्सईव्ही 9 ई पॅक दोनचे वितरण

दैनिक युवक आधार

पनवेल (प्रतिनिधी) महिंद्राच्या इलेक्ट्रिक ओरिजन एसयूव्हींनी भारतीय ईव्ही बाजारपेठेत मूल्याच्या बाबतीत अग्रेसर स्थान मिळवले आहे. ग्राहकांचा विश्वास आणि त्यांनी दाखवलेल्या उत्साहामुळे देशभरात दर दहा मिनिटांना इलेक्ट्रिक एसयूव्हीची विक्री होते. हा उत्साहवर्धक प्रतिसाद कायम ठेवत महिंद्रा त्यांच्या प्रसिद्ध बीई ६ आणि एक्सईव्ही ९ई पॅक दोनचे वितरण जुलैअखेरपासून २१.९० लाख रुपयांना सुरू केले जाणार आहे. ग्राहकांनी दिलेला जोरदार प्रतिसाद लक्षात घेत महिंद्राद्वारे

mahindra Rise

पॅक टु सध्या उपलब्ध असलेल्या ५९ केडब्ल्यूएच व्हेरिएंटबरोबरच ७९ केडब्ल्यूएच बॅटरी पर्यायात उपलब्ध केले जाणार आहे. या व्हेरिएंटद्वारे अनुक्रमे ५०० किमी आणि ४०० किमी रेंज शहरात मिळणार आहे. या किंमतीमध्ये चार्जर आणि इन्स्टॉलेशन खर्चाचा समावेश नाही. ७.२ किलोवॅट आणि ११. २ किलोवॅट दोन चार्जर पर्याय चार्जेबल बेसिसवर उपलब्ध केले जातील.दोन्ही बॅटरी पर्यायांमध्ये महिंद्राचे अत्याधुनिक तंत्रज्ञान, १६ स्पीकर हर्मन कार्डन साउंड सिस्टीम डॉल्बी अटमॉस, संपूर्ण काचेचे छत, २ लेवल अत्याधुनिक, ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टीम्स (लेल २ एडीएएस), XEV 9E मध्ये ट्रिपल स्क्रीन वाइड सिनेमास्कोप, बीई ६ मध्ये रेस रेडी डिजिटल कॉकपिट इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत. या सुविधांमध्ये नाविन्य, सुरक्षा व आधुनिक आलिशानता यांचा मेळ घालण्यात आला आहे. त्याशिवाय महिंद्रा बीई ६ पॅक दोन मध्ये पॅक थ्रीप्रमाणे प्रीमियम सेज लेदरचे इंटेरियर्स देत असून त्याला केबिनचा प्रशस्त व अभिजात स्वरूप उंचावण्यासाठी उच्चभ्रू आयव्हरी रूफ फिनिशची जोड देण्यात आली आहे. प्रतीक्षेत असलेल्या सर्व ग्राहकांना त्यांचे बुकिंग नवीन पॅक दोन ७९ केडब्ल्यूएच, 79 केडब्ल्यूए व्हेरिएंटमध्ये अपग्रेड करण्याची संधी असून त्यातून महिंद्राची ग्राहकांच्या आवडीप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्याची बांधिलकी दिसून येते.

# रिक्षा चालकांनी घेतली नवनिर्वाचित वरिष्ठ अधिकारी अजय भोसले साहेब यांची भेट

दैनिक युवक आधार
कलंबोली वार्ताहर

: कळंबोली वाहतूक शाखेचे नवनिर्वाचित वरिष्ठ अधिकारी अजय भोसले यांनी मंगलवार दिनांक . ०१/०७/२०२५ रोजी कळंबोली वाहतूक शाखेचा पदभार स्वीकारला. याच्या आधी ते मुंबई येथे कार्यारित होते. अजय भोसले साहेब हे मनाने खूप प्रेमळ आहेत. तर कायद्याने खूप कठोर आहेत.

कळंबोली वाहतूक शाखेमध्ये नवीन वरिष्ठ अधिकारी आले आहेत. ही बातमी खांदेश्वर रिक्षा चालक-मालक संघटनेला समजली. त्यांनी त्याची भेट घेण्याचे ठरवले आणि शुक्रवार दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सायंकाळी खांदेश्वर रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष मच्छिंद्र पाटील हे आपल्या संघटनेमधील पदाधिकाऱ्यांना घेऊन कळंबोली वाहतूक शाखेमध्ये गेले. परंतु योगायोगाने त्यावेळी साहेबांचा वाढदिवस होता. खांदेश्वर रिक्षा चालक-मालक संघटनेमध्ये आनंद झाला. कारण साहेबांचा वाढदिवस आणि रिक्षा चालक मालक संघटनेची भेट. हा एक योगायोग होता. संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी साहेबांची भेट घेत त्यांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा दिल्या.खांदेश्वर रिक्षा चालक-मालक संघटनेच्या शुभेच्छा साहेबांनी मनापासून स्वीकारल्या व धन्यवाद देऊन काही कायद्याच्या गोष्टींची जाणीव करून दिली.

आपली रिक्षा ही आपली रोजी रोटीचा साधन आहे. त्यामुळे तुम्ही इमानदारीने आपली रिक्षा चालवा. कायद्याचा योग्य ते पालन करा. रिक्षा चालकांनी ही त्यांच्या हो ला हो मिळवत साहेबांना वाढदिवसाच्या पुन्हा शुभेच्छा दिल्या. त्यावेळी कलंबोली वाहतूक शाखेचे कर्मचारी साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी तेथे उपस्थित होते.





सतीश गायकवाड व पूजा गायकवाड यांनी चि.अथांगचा वाढदिवस शिरढोण येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालयात १०० गरीब व गरजू विद्यार्थ्यांना ६०० वह्यांचे वाटप करून साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. सचिन सोनवणे, डॉ. स्वरांजली गायकवाड व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. (दैनिक युवक आधार)

# पी एम श्री शाळा मुळेखंड शाळेत "वारी पंढरीची... माऊली महाराष्ट्राची..." उपक्रमाचे आयोजन.



**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

"विठू माऊली तू, माऊली जगाची... माऊलीत मूर्ति विठ्ठलाची""या उक्तीप्रमाणे आज शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ पीएमश्री शाळा मुळेखंड शाळेमध्ये देवशयनी आषाढी एकादशी निमित्त उद्या सुट्टी असल्याने दप्तर विना शाळा या उपक्रमातून वारी पंढरीची माऊली महाराष्ट्राची या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील मुलं मुली वेशभूषा करून वारकऱ्यांच्या रूपात शाळेत आली होती शाळेतील या वारकरी मुलींनी डोक्यावर तुळस घेऊन पालखी सजवून विठ्ठल रुक्माई च्या मूर्तीची गावातून वाजत गाजत वारी काढण्यात आली. या वारीमध्ये नृत्य, रिंगण फुगडी, बस फुगडी, खेळ खेळत वारकरी विद्यार्थ्यांनी ,शिक्षकांनी त्याचप्रमाणे गावातील ग्रामस्थांनी सहभागी होऊन गावातील साई मंदिर व शाळेच्या मैदानात फेर धरून पांडुरंगाचे दर्शन पूर्ण गावाला घडवलं या उपक्रमात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनीषा म्हात्रे मॅडम ज्येष्ठ मार्गदर्शिका जयवंती आई ठाकूर, ओम साई महिला बचत गट, अंगणवाडी ताई, शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर जेष्ठ मार्गदर्शिका विद्या वाणी मॅडम, दिशा तांडेल मॅडम, संजय होळकर सर,अर्चना पाटील मॅडम व ग्रामस्थ महिला सहभागी झाले होते. या दिंडीचे आयोजन शाळेचे उपक्रमशील शिक्षक संजय होळकर सर यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने उत्तम प्रकारे करून संस्कृती जतन करून वारीची परंपरा अबाधित ठेवली आहे. शेवटी शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर यांनी ही वारी यशस्वी केल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती पालक ग्रामस्थ शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक करून धन्यवाद दिले.

# क्रांतिकारी शिक्षक संघटनेचा शिक्षक समन्वय संघाच्या शाळा बंद आंदोलनाला पाठिंबा

## शासनाने शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न तत्काळ सोडवावेत:-कादरी शाहीद सर

दैनिक युवक आधार

पाटोदा (प्रतिनिधी) - विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या न्याय हक्कांसाठी शिक्षक समन्वय संघाने ८ जुलैपासून बेमुदत शाळा बंद आंदोलन सुरू केले असून, या आंदोलनाला आता क्रांतिकारी शिक्षक संघटनेचा ठाम पाठिंबा मिळाला आहे. १४ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार, अशा शाळा, वर्ग व तुकड्यांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे ठरले होते. मात्र ५ जून २०१५ पासून सुरू असलेल्या आंदोलनाकडे सरकार सातत्याने दुर्लक्ष करत असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष आहे. क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव कादरी शाहीद सर यांनी प्रसार माध्यमांद्वारे जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे "शिक्षकांना एकीकडे 'देशाचे शिल्पकार' म्हणत त्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करायचा, पुरस्कारांनी गौरवायचे, आणि दुसरीकडे त्यांनाच उपेक्षित ठेवायचे हा विरोधाभास सहन केला जाणार नाही. शिक्षकांवरील अन्याय आम्ही खपवून घेणार नाही." ते पुढे म्हणाले, "२०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे हजारो शिक्षकांचे जीवन अंधारात गेले आहे. शिक्षक रस्त्यावर उतरले असताना



सरकारचे मौन अक्षम्य आहे. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक उग्र आणि राज्यभर पसरवले जाईल." या आंदोलनात राज्यातील शिक्षक आझाद मैदानावर उपस्थित राहून आपल्या हक्कांसाठी संघर्ष करत आहेत. क्रांतिकारी शिक्षक संघटना त्यांच्या बरोबर खंबीरपणे उभी असून, हे आंदोलन यशस्वी होईपर्यंत पाठिंबा देत राहील, असे संघटनेचे इतर पदाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.



पाटोदा नगर पंचायतचे माजी सभापती, नगरसेवक श्रीहरी गिते पाटील (बापु) यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा देताना. आष्टी /पाटोदा /शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, सचिव पत्रकार अँड. महेश बेदरे, वामनभाऊ ट्रेडर्सचे मालक सुदर्शन चव्हाण दाजी, उमेश मुंढे यांच्या सह इतर
(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)

# साधना येरेकार यांना सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगाव:- न्यु इंग्लिश हायस्कूल पगारदार कर्मचारी सहकारी संस्थेकडून न्यू इंग्लिश हायस्कूल येथील कार्यरत शिक्षिका सौ.साधना येरेकार यांना दिनांक ३० जून रोजी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भावस्पर्शी निरोप देण्यात आला

यावेळी सौ.साधना येरेकार यांनी दि. ३० जुन रोजी शासनाचे नियमानुसार वयाची ५८ वर्ष पूर्ण झाल्यामुळे शासकीय सेवेतून त्या निवृत्त झाल्या. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भावस्पर्शी या निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय पतसंस्थेच्या अध्यक्षा कु.रेखा कुमरे या होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंग्लिश हायस्कूल चे मुख्याध्यापक विजय कचरे, उपमुख्याध्यापक सुरेश कोवे शिफ्ट इन्चार्ज अरुण कामनापुरे,पतसंस्था उपाध्यक्ष विनोद चिरडे हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित होते. यावेळी सौ साधना येरेकार यांना सेवानिवृत्ती निमित्त न्यु इंग्लिश हायस्कूल पगारदार कर्मचारी सहकारी संस्था यांच्याकडून शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.तसेच यावेळी सौ साधना येरेकार यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमाचे निमित्ताने शाळेतील अनेक शिक्षकांनी,प्रमुख पाहुण्यांनी तसेच सत्कारमूर्ती यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले.निरोप समारंभाच्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्था सचिव किशोर उईके यांनी तर आभार प्रदर्शन विनोद चिरडे यांनी केले.या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक उपस्थित होते.




# आषाढी एकादशी निमित्त कपारीच्या विठोबाची महायात्रा

## धाकटी पंढरी म्हणून प्रसिध्द असणाऱ्या कपारीच्या विठोबाची महायात्रा

दैनिक युवक आधार
आष्टी प्रतिनिधी
बाळासाहेब रकटाटे

आष्टी तालुक्यातील नांदूर येथे विठ्ठलाचे मंदिर आहे हे कपारीचा विठोबा या नावाने देवस्थान प्रसिद्ध आहे या ठिकाणी आषाढी एकादशीनिमित्त महायात्रेचे आयोजन केले असल्याचे देवस्थान ट्रस्टच्या वतीने कळवण्यात आले आहे. नांदूर विठ्ठलाचे या ठिकाणी विठ्ठलाचे जागृत देवस्थान आहे.

ज्या भाविकांना आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाने शक्य होत नाही ते भाविक दरवर्षी धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कपारीच्या विठोबाच्या दर्शनासाठी येतात या ठिकाणी दरवर्षी फार मोठी यात्रा भरते आष्टी तालुक्यासह पाथर्डी अहमदनगर पाटोदा बीड व इतर ठिकाणाहून लोक दर्शनासाठी येतात परिसरातील लोक आपापल्या गावातून दिंडी काढून विठ्ठल नामाचा गजर करीत या ठिकाणी येतात आठवड चिचोंडी अंभोरा सालेवडगाव हिवरा पिंपरखेड धानोरा व इतर ठिकाणाहून दिंड्या येतात व सर्व परिवार भक्तिमय होतो विशेष म्हणजे बहुतांशी लोक दर्शनासाठी पायी येतात या ठिकाणी देवस्थान ट्रस्टच्या वतीने दिवसभर पाणी व फराळाची सोय केली जाते दर्शनाची रांग पार्किंग व्यवस्था याची पूर्ण तयारी झाली असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने देण्यात आली आहे नांदूर येथील कपारीचा विठोबा हे प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाते. अत्यंत निसर्गमय वातावरणामध्ये हे मंदिर आहे.






# रस्ता मोकळा करण्यासाठी सामाजिक पुढाकार – ॲड. योगिता सावंत यांचे स्तुत्य कार्य



दैनिक युवक आधार
किशोर रमाकांत गुडेकर,
मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख

मुंबई, दि. ३ जुलै २०२५ (प्रतिनिधी):
जे.जे. रुग्णालयाच्या गेट क्रमांक ९ बाहेरील रस्त्यावर झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्यामुळे नागरिकांना व वाहनचालकांना त्रास होण्याची शक्यता होती. या समस्येची दखल घेत सामाजिक कार्यकर्त्या आणि ॲडव्होकेट योगिता सावंत यांनी तत्काळ पुढाकार घेत बीएमसी कर्मचाऱ्यांना बोलावले व स्वतः त्यांच्यासोबत उभे राहत झाडांची छाटणी करून रस्त्यावरून अडथळे हटवले.
सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत झालेल्या या मोहिमेत ॲड. सावंत यांनी सार्वजनिक सुरक्षिततेचा विचार करून अपघात टाळण्यासाठी स्वतः हातात काठी घेऊन झाडांच्या फांद्या रस्त्यावरून हटवल्या. या उपक्रमामुळे त्या भागातील रहदारी सुरळीत झाली असून नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

# वारला जिल्हा परिषद सर्कलचे दिलदार नेतृत्व - सुरेश राठोड

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम
गजानन पवार पाटील.

वाशिम तालुक्यातील सोंडा गावचे सुरेश चाफा राठोड. या दिलदार सदाबहार आणि विकासाची दृष्टी असलेल्या युवा नेत्याचा जन्म शेतकरी कुटुंबात 5 जुलै 1985 रोजी झाला. सुरेश राठोड यांच्या कुटुंबाचा शेती व्यवसाय असून त्यांच्या परिवाराची नाळ काळ्या मातीशी जुळलेली आहे. सुरेश राठोड यांना शालेय जीवनापासूनच सामाजिक कार्याचे आवड होती. त्यांचे वडील चाफा राठोड 2003 ते 2008 पर्यंत. वाशिम पंचायत समितीचे सदस्य होते. त्यांच्या परिवाराला कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांचे वडील पंचायत समितीच्या निवडणुकीत प्रतिस्पर्धी धन दांडग्या उमेदवाराच्या विरोधात विजयी झाले होते. तेव्हापासून सुरेश राठोड राजकीय कार्यात सहभागी झालेत. त्यांनी वारला सर्कल मधील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून विविध विकास कामे करून ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य दिले. सुरेश राठोड यांनी सर्वप्रथम 2011 मध्ये सोंडा येथील सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेऊन त्यांची पॅनल निवडून आणून प्रस्थापितांना पराभूत केलं. तेव्हापासून ते सलग तीन वेळा सेवा सहकारी संस्थेचे बिनविरोध सदस्य आहेत. एका निवडणुकीत तर सुरेश राठोड आणि त्यांची पत्नी सर्वाधिक मतांनी निवडून आलेत. नंतर सोडा ग्रामपंचायतच्या निवडणुकीत ते सक्रिय झाले. ते ग्रामपंचायतीच्या सदस्य आणि एक वेळा उपसरपंच होते. सुरेश राठोड यांचे जिल्ह्यातील सर्वपक्षीय राजकीय मंडळी सोबत सलोख्याचे संबंध आहेत त्यांनी आपल्या ओळखीच्या माध्यमातून सोंडा गावासह वारला जिल्हा परिषद सर्कल मधील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेतला. सामाजिक राजकीय कार्यासोबतच त्यांनी सहकार क्षेत्रामध्ये आपल्या कर्तुत्वाची मुहूर्तमेढ रोवली. वाशिम तालुका खरेदी विक्री संस्थेचे ते दोन वेळा संचालक म्हणून ते निवडून आलेत. जिल्हा परिषद पंचायत समिती तहसील जिल्हाधिकारी कार्यालय जलसंपदा सार्वजनिक बांधकाम विभाग. विद्युत वितरण कंपनीसह विविध शासकीय कार्यालयातील गोरगरीब शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांची कामे करण्यात त्यांचा पुढाकार वाखाण्याजोग आहे. एवढेच नव्हे तर अनेक कामे मंत्रालयामध्ये जाऊन करून आणतात. त्यांच्या विकासाच्या दृष्टीमुळे वारला सर्कल सह वाशीम जिल्ह्यात सर्व परिचित कार्यकर्ता म्हणून ओळखले जातात. सुरेश राठोड सध्या अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते असून त्यांचा सहभाग विविध कार्यात असतो. तेलंगणा राज्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांना प्रदेश काँग्रेसच्या वतीने प्रचारासाठी पाठवले होते. त्यांनी तन-मन-धनाने प्रचार करून त्या मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवाराला दणदणीत विजयी करून दिले आहे. सुरेश राठोड यांना आगामी वारला जिल्हा परिषद सर्कलची निवडणूक लढण्याची इच्छा आहे. पक्षश्रेष्ठींनी आणि नेतेमंडळी ने त्यांच्यासारख्या युवा कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्यास ते संधीच सोनं करून वारला सर्कल मध्ये विकासाची गंगा आणण्यासाठी पुढाकार घेणार आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. त्यांना विविध स्तरातून त्यांच्या मित्रमंडळीने शुभेच्छा देऊन त्यांच्या संकल्प पूर्तीसाठी शुभकामना दिल्या आहेत.



साध्य दैनिक उज्वल मालेगाव परिवारातर्फे. व गजानन पवार पाटील यांच्यातर्फे आपणास वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा सुरेश भाऊ राठोड. सोंडा.

# शिवसेना जिल्हाप्रमुख पदी संजय काळे यांची फेरनिवड

दैनिक युवक आधार
सणसर :- विकास क्षत्रिय

इंदापूर तालुक्यातील बेलवाडी गावचे शाखा प्रमुख ते जिल्हा प्रमुख म्हणून सलग दुसऱ्या वेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे युवा नेते मा संजय भाऊ काळे यांची पुणे जिल्हा प्रमुख पदी फेर निवड करण्यात आली आहे.त्यांनी मागील काळात केलेले सार्वजनिक व सामाजिक कार्याचा आढावा घेऊन ही निवड करण्यात आलेली दिसत असून यावेळी इंदापूर व दौंड तालुक्यातील सर्व शिवसेना कार्यकर्ते यांना कसलीही अडचण येऊ देणार नाही व मागील कामाप्रमाणे यावेळी ही पक्षवाढीसाठी माझे कायम काम चालू राहणार असल्याचे मत नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख संजय काळे यांनी सांगितलं आहे.मा संजय काळे यांची जिल्हाप्रमुखपदी निवड झाल्यानंतर इंदापूर तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





दैनिक युवक आधार – त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती अभियान व नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत उलवे पोलीस स्टेशन याच्या सहाय्याने रेड क्लिप स्कूल उलवे या ठिकाणी व्यसनमुक्त जीवन काळाची गरज सादरकरते आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांचं विद्यार्थ्यांना विशेष व्याख्यान यावेळी शेकडो विद्यार्थी उपस्थित होते व्यसनापासून काय काय परिणाम होतात याची सविस्तर माहिती व्यसनमुक्त जीवन का असावे याबाबत श्री दिलीप किसनराव आमले यांनी सविस्तर माहिती दिली यावेळी सौ अश्विनी पाटील पोलीस निरीक्षक,सौ सुंदरी दुबे प्रिन्सिपल रेड क्लिप स्कूल उलवे,श्री दिलीप चव्हाण जिल्हाध्यक्ष मराठा संघ, श्री नलगे सर सदस्य जीवन विद्या, श्री उत्तम अंबावडे शिव वाहतूक सेना, श्री दूधभाटे समाजसेवक शाळेतील शिक्षक शिक्षिका उपस्थित होते सर्व विद्यार्थ्यांना मी कधीच व्यसन करणार नाही अशी शपथ घेतली आहे

# जासई विद्यालयात निघाली आषाढी एकादशी निमित्त विठू नामाची वारी आणि वृक्षदिंडी

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनियर कॉलेज दहागाव विभाग,जासई ता.उरण जि. रायगड या विद्यालयात, आषाढी एकादशीनिमित शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी वारकरी दिंडी ,ग्रंथ तसेच वृक्षदिंडी उत्साहात साजरी करण्यात आली . या कार्यक्रमाला महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान चे सदस्य श्री. रघुनाथ ठाकूर , विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी . मॅडम ,पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम , सर्व सेवकवर्ग , विविध वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी वारकरी तसेच इतर विद्यार्थी या दिंडीसाठी उपस्थित होते.

सकाळी विद्यालयाच्या प्रांगणात पालखीचे पूजन श्री. रघुनाथ ठाकूर तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी. मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व सेवकांनीही पालखीचे पूजन केले. त्यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल - रुक्मिणी आणि सर्व संतांची वेशभूषा करून तसेच



वृक्ष संवर्धनाचे पोस्टर , डोक्यावरील ग्रंथ यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री . गाताडी सर यांनी झाडांचे महत्व पटवून दिले. सौ. ठाकूर ए. व्ही. मॅडम यांनी लेझीम च्या तालावर विठ्ठल जयघोष घेतला .त्यानंतर लेझीम व बैंड च्या तालावर फुलापानांनी सजविलेल्या पालखीत ज्ञानेश्वरी व विठ्ठल रुक्मिणीची प्रतिमा ठेवून वृक्षदिंडी जासई विद्यालयातून संपूर्ण गावात फिरविण्यात आली.सर्व विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा जयघोष करत लेझिम आणि बैंड च्या तालावर पर्यावरण विषयी घोषणा दिल्या . गावातील सुवासिनी,नागरिक, आबाळवृद्ध यांनी पालखीचे दर्शन घेतले . शेवटी दिंडी संपूर्ण गावातून फिरून विद्यालयात परतली. त्यानंतर विद्यार्थी , शिक्षकांनी विठ्ठलाची विविध गाणी गायली. इयत्ता पाचवी च्या मुलींनी विठ्ठल गीतावर नृत्य सादर केले. मा. मुख्याध्यापिका , पर्यवेक्षिका तसेच सर्व सेवकांच्या हस्ते विठ्ठलाची आरती ओवाळण्यात आली . सर्व विद्यार्थ्यांना पोषण आहारासोबत विद्यालयाकडून गोड जिलेबी देण्यात आली. शेवटी श्रीम घरत एम . के . मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले . अश्या प्रकारे सर्व अधिकारी , सेवकांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला .

# चिखलातून वाट – अनेक वर्षांपासून रोड नाही

**सत्यदृश्य #नागरिकांचीहाक #स्वच्छतेचा सवाल**

प्रतिनिधीः उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी

"डोळंबा गावातील मुख्य चौकातील हातपंप जवळ चिखलातून महिलांना भराव लागत पाणी ,अनेक दिवसांपासून ग्रामपंचायतचे दूर लक्ष हा चिखल नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्यावरचा गंभीर आघात आहे! डास, दुर्गंधी आणि संसर्गजन्य रोगांच्या छायेत जगणारे नागरिक प्रशासनाकडून केवळ 'बघ्याची भूमिका' अनुभवत आहेत." प्रशासन जागे होईल तेव्हा होईल... पण तोपर्यंत ही सत्य दृश्यं शासनाच्या दरबारात पोहोचवणे हीच आमची जबाबदारी. फोटोतून शासनदरबारी आवाज पोहोचवत आहेत दैनिक व आधारचे उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी



# श्री.के.व्ही.एस ट्रस्ट महात्मा गांधी पब्लिक स्कूल तर्फे टायलेंट शो ...

## मराठी मुलांच्या शिक्षणासाठी सदैव कटिबद्ध...डॉ. क्रिष्णकुमार

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

अदाई येथील श्री.के.व्ही.शनमुगम मेमोरियल एज्युकेशन फाउंडेशन महात्मा गांधी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज तर्फे टायलेंट शो मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असताना गरजूं विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण सवलत मिळेल अशी घोषणा. टायलेंट शो चा प्रारंभ गणेश पूजन व पुष्पहार अर्पण करून, ज्ञानदीप म्हणून मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. सन्मानित पाहुणे म्हणून व्यासपीठावर पोलीस निरीक्षक CID नितीन पाटील, अनिसा शेख,पराग म्हात्रे,जितेंद्र जिकम,अनिकेत देठे, शरद घोडके, बाळासाहेब पगारे,ताहेर सय्यद, राजन शेलार,प्रविण शेंडे ,साबीर शेख,निखिल उपाध्याय उपस्थित होते. श्री.के.व्ही.एस ट्रस्ट चेअरमन डॉ. क्रिष्णकुमार यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर त्यांच्या हस्ते सर्व पाहुण्यांचे नारळ, शॉल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत सत्कार व सन्मान करण्यात आले. संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आपली कला,संगीत,नृत्यकला,क्राफ्टस,खाद्य संस्कृती, मेहंदी कला सादरीकरण करून कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणीत केला .कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गाऊन करण्यात आली. श्री. के.व्ही.एस ट्रस्ट चेअरमन व व्यवस्थापन



कमिटी ने विद्यार्थी ,शिक्षकेतर, कर्मचारी वर्गाने अदाई ग्रामस्थ तसेच पालक ,पत्रकार व सहकारी वर्गाचे आभार मानले.

# घाटंजीः 'व्हॉट्सअॅप' समूहातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा नवा वसा घाटंजी सकाळ, नवप्रहार वृत्तपत्र समूहचा अभिनव उपक्रम

### साहेब पैसे नकोत!शैक्षणिक साहीत्यरुपी मदतीचा हात द्या. उपक्रमा अंतर्गत १२० विद्यार्थ्यास शैक्षणिक साहीत्य,खाऊं वाटप

दैनिक युवक आधार
घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)

सध्याचे डिजिटल युगात वॉट्सप,शोषल मिडिया व सामाजिक माध्यमांचा सकारात्मक उपयोग करत घाटंजी येथील दैनिक सकाळ,नवप्रहार समूह च्या माध्यमातून व काही सामाजिक जान असलेल्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवण्यासाठी 'व्हॉट्सप समूहा'च्या माध्यमातून एक अभिनव उपक्रम राबवण्यात आला. यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल,वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना मदत करण्याचा उद्देश ठेवून 'शैक्षणिक मदतीसाठी एक पाऊल' पुढे येत 'साहेब पैसे नकोत! गरजू ,गरिब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहीत्य रुपी मदतीचा हात द्या.' म्हणत अभिनव उपक्रमातून न.प. शाळा क्र.२ येथे ११० विद्यार्थ्यांना व ईतर १० असे १२० विद्यार्थी यांना बुक,२ पेन,पेन्सिल, शॉपनर, खोडरबर,स्केल,पाऊच, व बिस्कीट चे वितरण करण्यात आले. या कार्यक्रम चे अध्यक्षस्थानी न.प. मुख्याधिकारी राजु घोडके होते तर प्रमुख पाहूणे म्हणून शैक्षणिक साहीत्यरुपी मदततीच्या कार्यासाठी पुढाकार घेणारे रामभाऊ अग्रवाल (व्यापारी), दैनिक सकाळचे प्रतिनिधि अमोल राऊत, ज्ञानेश्वर पोटपील्लेवार,विलास कठाणे, संतोष पोटपील्लेवार, शाळा मुख्याध्यापक साखरकर सर, वॉट्स समूह निर्माता सचिन कर्णेवार हे उपस्थित होते.

या उपक्रमात शाळेतील ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहीत्यरुपी मदत देण्यात आली. विशेष म्हणजे या मदतीमध्ये विद्यार्थीनी साठी नवीन व उत्तम प्रतीचं साहीत्य लेडीज पाऊच साहित्य देण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यास मार्गदर्शन करताना सचिन कर्णेवार यांनी घाटंजी ता दैनिक सकाळ, नवप्रहार समूहच्या निर्मीतीचा उदेश विषद केला. यात सोशल मीडिया माध्यमातून हाय,हॅलो,बाय,व ईतर वाह्यात पोस्ट करणे-पाहणे पेक्षा यांचा योग्य समूहवापर केला तर



नक्कीच एक उत्तम शैक्षणिक, सामाजिक लोकहीतकारक कार्य घडेल असे त्यांनी मार्गदर्शनात सांगितले. न. प. मुख्याधिकारी राजु घोडके साहेब यांनी विद्यार्थी हीतगुंज साधतांना अशा सामाजिक लोकहीतकारक कार्याची समाजात गरज असल्याचे बोलत या शैक्षणिक साहीत्य रुपी मदतीचा हात उपक्रमाचे स्वागत केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिक्षीका वृषाली अवचित यांनी केले तर आभार कृष्णा मडावी सर यांनी मानले. यशस्वीतेसाठी संजय गोल्हर, तुषार बोबडे, नरेंद्र राठोड,गिनगुले, दिव्या आरानकर , प्रांजली अवचित सह ईतरही शाळा कर्मचारी यानी सहकार्य केले.

या उपक्रमाचे संयोजक सचिन कर्णेवार यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांचं शिक्षण आर्थिक अडचणींमुळे थांबू नये, छोटेखानी का होईना पण, सोशल मीडिया समूहाच्या माध्यमातून विद्यार्थी शैक्षणिक मदतीस समाज जागृत लोकांनी पुढे यायला हवं हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे."

# परतूर येथील योगानंद प्राथमिक शाळेत अवतरले पंढरपूर.....

दैनिक युवक आधार
परतूर- जालना (अशोक ठोके )

परतूर येथील योगानंद प्राथमिक शाळेमध्ये आषाढी एकादशी निमित्त पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या पोशाखात व विठ्ठल - रुक्मिणी यांच्या वेषभूषेत गळ्यात टाळ व डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन ज्ञानोबा ज्ञानोबा माऊली च्या जयघोषात टाळ मृदंगांच्या गजरात फुगडी खेळत मोठ्या उत्साहात दिंडी काढण्यात आली .यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक दिलीप साळवे व सहशिक्षक श्रीमती आंबेकर मॅडम,श्रीमती शर्मा मॅडम ,श्रीमती मगर मॅडम , श्रीमती भागवत मॅडम, यश पुरी ,उमेश हिवाळे यांनी दिंडी काढण्यात सहकार्य केले.





# उमेश शिंदे शासकीय तंत्रनिकेतन मधुन 34 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त





**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

पेण येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील प्रमुख लिपिक उमेश गोपीनाथ शिंदे हे आपल्या 34 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर तसेच ग्रंथपाल चित्ररेखा धनाजी म्हात्रे या 31 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सोमवार 30 जून रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. महेंद्र चितलांगे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विभागप्रमुख डॉ. राजेश पाध्ये व संस्थेचे प्रबंधक आरती पंचमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सदरील निरोप समारंभ कार्यक्रमात उमेश शिंदे व चित्ररेखा म्हात्रे यांचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ व भेट वस्तु देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. सदरील कार्यक्रमाला यंत्र अभियांत्रिकी अधिव्याख्याता डॉ. संजय मोतलिंग व डॉ. शरद जगताप,गीता (पुष्पा) शिंदे,दिलीप कदम,सतीश मोरे,अविनाश यादव,संतोष मोरे,श्रीकांत शिंदे,सतीश शिंदे, प्रकाश जगे,गणेश शिंदे,दीपा मोरे,उमा शिंदे,स्वाति शिंदे,कोमल शिंदे,अथर्व शिंदे यांच्यासह उमेश शिंदे व चित्ररेखा म्हात्रे यांचे कुटुंबासह संस्थेचे अधिकारी शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद जगताप यांनी केले असून कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनांनी करण्यात आली.

# मा . माजी मंत्री संजयजी बनसोडे यांना वाढदिवसाच्याकार्यकर्त्याकडून शुभेच्छा !

## उदगीर व जळकोट मतदार संघातील शेतकरी नाराज ?

दैनिक युवक आधार
उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंग

उदगीर जळकोट मतदार संघाचे माजी क्रीडा युवक मंत्री तथा माननीय आमदार संजय जी बनसोडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त उदगीर व जळकोट शहरांमध्ये त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांनी अन अधिकृतरित्या राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग येथे अनेक प्रकारे संजयजी बनसोडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनर लावून शुभेच्छा देण्यात आले व यांचे उदगीर शहरांमध्ये अनेक जेसीबी मार्फत फुलाचा वर्षाव करून वाढदिवस साजरा करण्यात आला पण शेतकरी शेतमजूर यांना काय मिळाले व माननीय माजी मंत्री संजयजी बनसोडे साहेब यांनी उदगीर व जळकोट मतदार संघासाठी शेतकरी शेतमजुरांसाठी कुठलीही प्रकल्प उभे केले नाही व विधानसभा निवडणुकीमध्ये आमदारांनी व यांचे वरिष्ठ नेते मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, व मा. उपमुख्य मंत्रीआजीत दादा पवार साहेब यांनी शेतकरी यांची कर्जमाफी करणार अशा आश्वासन देऊन सुद्धा आज दीड ते दोन वर्षापासून शेतकऱ्यांची कर्जमाफी नसून शेतकरी व शेतमजुरांवरअनेक संकटाची कुठल्याही प्रकारची दखल जळकोट व उदगीर मतदार संघात व संपुर्ण माहाराष्ट्र मध्ये दखल घेतली गेली नाही म्हणून जळकोट उदगीर मतदार संघातील शेतकरी व शेतमजूर व सुशिक्षित बेकार ऑटो रिक्षा चालक व इतर लोकांनी माननीय संजयजी बनसोडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक प्रकारची चर्चा केली व यांच्या जवळीक असलेल्या कार्यकर्त्यांनी माननीय साहेबांनी अनेक कामे देऊन मोठे केले आहे म्हणून सदर व्यक्ती त्यांना फक्त बॅनरबाजी मार्फत शुभेच्छा देत आहेत पण अनेक शेतकरी यांनी कुठल्याही कर्ज कर्जमाफी बाबत माननीय संजयजी बनसोडे साहेब हे विधानसभेत चर्चा करत नाही म्हणून उदगीर जळकोट मतदार संघातील शेतकरी माननीय संजयजी बनसोडे यांच्यावर नाराज होत . शुभेच्छा न देता चौका चौकामध्ये यांच्या कर्ज मार्फ करणार का नाही चर्चा सुरू आहे .




# साधना येरेकार यांना सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** न्यु इंग्लिश हायस्कूल पगारदार कर्मचारी सहकारी संस्थेकडून न्यू इंग्लिश हायस्कूल येथील कार्यरत शिक्षिका सौ.साधना येरेकार यांना दिनांक ३० जून रोजी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भावस्पर्शी निरोप देण्यात आला यावेळी सौ.साधना येरेकार यांनी दि. ३० जुन रोजी शासनाचे नियमानुसार वयाची ५८ वर्ष पूर्ण झाल्यामुळे शासकीय सेवेतून त्या निवृत्त झाल्या. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त भावस्पर्शी या निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय पतसंस्थेच्या अध्यक्षा कु.रेखा कुमरे या होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंग्लिश हायस्कूल चे मुख्याध्यापक विजय कचरे, उपमुख्याध्यापक सुरेश कोवे शिफ्ट इन्चार्ज अरुण कामनापुरे,पतसंस्था उपाध्यक्ष विनोद चिरडे हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित होते. यावेळी सौ साधना येरेकार यांना सेवानिवृत्ती निमित्त न्यु इंग्लिश हायस्कूल पगारदार कर्मचारी सहकारी संस्था यांच्याकडून शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.तसेच यावेळी सौ साधना येरेकार यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमाचे निमित्ताने शाळेतील अनेक शिक्षकांनी,प्रमुख




पाहुण्यांनी तसेच सत्कारमूर्ती यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. निरोप समारंभाच्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्था सचिव किशोर उईके यांनी तर आभार प्रदर्शन विनोद चिरडे यांनी केले.या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक उपस्थित होते.

# संताचिया माथा चरणावरी स्मरणीय वैकुंठ गमन

## संत हरीसा गुरूजी पायदळ वारी महागाव कळमेश्वर,पाडोदी ते पंढरपूर..

दैनिक युवक आधार
घाटंजी प्रतिनिधी

गेल्या 21 वर्षापासून ही परंपरा चालू आहे.. आपल्या परिसराचे वैभव,नामनिष्ठ व्यक्तिमत्व सखोल अभ्यास ज्याचा आहे असे हरिभक्त परायण.हरिभक्त परायण श्री विठ्ठल महाराज पुनसे यांच्या मार्गदर्शनात श्री हरिभक्त परायण सुनील महाराज राऊत, भागवताचार्य आळंदीकर. दिंडी चालक, श्री. ह. भ . प. नितीन महाराज बोकसे, ह. भ. प. श्री गजानन महाराज राऊत श्री विजय महाराज ढाकूलकर, ह.भ.प भाकरे महाराज,श्री सुरजीत महाराज, श्री लंकेश महाराज पवन महाराज, असे परिसरातील नामनिष्ठ महाराज मंडळी भाविक भक्तगण. 27 दिवसापासून पायदळ दिंडीमध्ये वारित पंढरपूरला आले.चंद्रभागेच स्नान झाल पांडुरंग परमात्म्याचे दर्शन झालं.प्रदक्षिणा पूर्ण झाली. व अधिष्ठानावर भागवत कथा सुरुवात झाली हरिभक्त परायण सुनील महाराज राऊत. यांच्या मुखर्वंदातून भागवताचं श्रवण भाविक भक्तगण करत आहे. दुसऱ्या. दिवसाची कीर्तन सेवा वारकरी परंपरेनुसार हरिभक्त परायण श्री मुकेश महाराज चुडे माजी सैनिक समाज प्रबोधन युवा कीर्तनकार यांची कीर्तन सेवा पार पडली. कीर्तनातून वारकरी संप्रदायाचे महत्व ,वारीचे महत्व वारकरी संप्रदायाची ताकद परंपरा तीर्थक्षेत्र पंढरपूर महत्व त्यांनी कीर्तनामध्ये व्यक्त केल. आता सर्व भाविकांना वाट लागली फक्त माऊलीची पालखी येण्याची व रिंगण सोहळा भरभरून माऊलीचा तुकोबारायाचे दर्शन पुन्हा एकदा व्हावं आणि आषाढी एकादशीला सर्वांनी पांडुरंग परमात्म्याचा गजर करावा द्वादस झाल्याच्या नंतर सर्व वारकरी आप आपल्या घराच्या दिशेने वाट करतात. गेल्या कित्येक हजार वर्षापासून ही परंपरा आजही महाराष्ट्राच्या मायभूमीत कायम आहे पांडुरंग परमात्मा सर्वांना सुख समृद्धी. देवो. ही पांडुरंगा चरणी प्रार्थना राम कृष्ण हरी.

# रानडुकरे, हरणांचा उपद्रव वाढला; उगवलेली कोवळी पिके खाऊन नष्ट करत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात

दैनिक युवक आधार
प्रविण तांबोळकर लातुर शिरुरआनंतपाळ : रानडुकरे व हरणांचे कळप शेतात पेरणी केलेले सोयाबीन व अन्य खरिपाची उगवण झालेली कोवळी



पिके खाऊन नष्ट करीत असल्यामुळे शिरूरआनंतपाळ तालुक्यातील शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. या दोन्ही वन्यजीव प्राण्यांना पकडून त्यांचा बंदोबस्त करण्याची यंत्रणा वनविभागाकडे नसल्यामुळे या दोन्ही प्राण्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होऊन खरिपाची पिके व ऊस खाऊन फस्त करण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन न उगवल्यामुळे दुबार पेरणी केली आता ऊगवलेले कोवळे सोयाबीन व ऊसाचे वन्यप्राणी नुकसान करत असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. यंदा खरिपाची पेरणी रिमझीम झालेल्या पावसाच्या ओलीवर करण्यात आली. परंतु नंतर पावसाने उघडीप दिल्याने हलक्या जमीनीतील ओल कमी झाल्याने

**अनुदानाऐवजी तारेचे कुंपण करून द्यावे... शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे अनुदान देण्याऐवजी त्यांच्या शेतीला तारेचे कुंपण करून देण्यात यावे. वन्यजीवांना पकडता व मारता पण येत नसल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या शेतीला तारेचे कुंपण करून द्यावे. शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदानाच्या स्वरूपात मिळणाऱ्या योजनेत शेतीला तारेचे कुंपणाची योजना नसल्यामुळे आजघडीला शेतकऱ्यांना एखादी योजना नाही मिळाली तरी चालेल; मात्र शेतीला तारेच्या कुंपणाची खरी गरज असल्यामुळे शासनाने यावर निर्णय घ्यावा. शिवाजी पेटे रयत क्रांती संघटणा मराठवाडा अध्यक्ष**

सोयाबीन बियाणे उगवलेच नाही त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. आता कसे तरी ऊगवलेल्या सोयाबीन व तूर पिकांची उगवण होऊन या पिकांची वाढ सुरू असतानाच रानडुकरे व हरणांचे कळप ही पिके फस्त करीत आहेत. कहर म्हणजे या दोन वन्य प्राण्यांसह गोगलगायची ही प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला असल्यामुळे शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. हरणांचे कळप व रानडुकरे शेतकऱ्यांच्या शेतात घुसून उगवण झालेल्या पिकांची पाने ऊस खाऊन फस्त करीत आहेत. रानडुकरे या पिकासह उभ्या उसाचे मोठे नुकसान करीत आहेत. सायाळ हे नवीन लागवड केलेली आंबा, वड, पिंपळ, कडूनिंबाची रोपे मुळासकट खाऊन नष्ट करीत आहेत. दरम्यान, वन्यजीवांना कोणालाही पकडता व मारता येत नाही, असे वन विभागाचे अधिकारी सांगत आहेत.

# उत्कृष्ट कार्याबद्दल लघु वृत्तपत्रांच्या वतीने शासकीय अधिकारी व समाजसेवकांचा सत्कार

दैनिक युवक आधार
वाशिम- वार्ताहर

आकांक्षीत. रिसोड प्रतिनिधी रणजितसिंह ठाकूर.... जिल्ह्यात विकासाची गंगा वाहती ठेवण्यासाठी झटणाऱ्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस., जिल्हयातील आरोग्य सेवेला राज्यात क्रमांक एकचा दर्जा देणारे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे व समाजसेवेत आपले संपूर्ण जीवन खर्ची घालणारे समाजसेवक निलेश सोमाणी यांचा लघु वृत्तपत्रांच्या वतीने शुक्रवार, ४ जुलै रोजी त्यांच्या कार्यालयात भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

जिल्ह्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांच्या नेतृत्वात ४० दिवसात ४० हजार जलतारा निर्मिती करून जिल्ह्याने भूजल पुनर्भरणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. या कामगिरीची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद करण्यात आली आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांचा तसेच तळागाळातील लोकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळवून देण्यासह आरोग्य सेवेला




राज्यात सन्मानाचे नवे आयाम देणारे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्यासह गोरगरीबांच्या मदतीसाठी सदैव धावून जाणारे व मुक्या प्राण्यांच्या सेवेसाठी तत्पर असणारे चैतन्याचे उर्जास्त्रोत, गोरक्षक, संवेदनशिल पत्रकार व विविध शासकीय पुरस्काराने सन्मानित झालेले सामाजीक कार्यकर्ते निलेश सोमाणी यांचा लघुवृत्तपत्र पिंगलाक्षी एक्सप्रेस व पहाटवारा परिवाराच्या वतीने पत्रकार गजानन बानोरे व संदीप पिंपळकर यांच्या हस्ते रिसोडचे ग्रामदैवत पिंगलाक्षी देवी यांची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले.

# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या एम.एस.ई.बी. बोकडविरा शाळेत आषाढी वारी भक्तिरसात साजरी

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या एम.एस.ई.बी बोकडवेरा उरण शाळेत दिनांक ५ जून २०२५ रोजी आषाढी एकादशी निमित्त शाळेमध्ये वारकरी दिंडी व पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास वायूविद्युत केंद्र माजी मुख्यअभियंता मा. मोहन आव्हाड साहेब तसेच शालेय समिती अध्यक्ष मा. महेश म्हात्रे सर, शालेय समिती चेअरमन मा. आनंद घरत सर, सुरक्षा दलाचे वरिष्ठ अधिकारी मा. केदार नाईक सर व वाघ मॅडम मान्यवर म्हणून उपस्थित होते.




शाळेच्या मुख्याध्यापिका हेमा कवळसे मॅडमनी सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेले सर्व विद्यार्थी वारकरी वेशभूषा करून आले होते. कु. केराप्पा सांगोलकर आणि कु. ज्ञानेश्वरी डोंगरे या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीची माहिती गोष्ट सांगितली. विद्यार्थ्यांनी पांडुरंगाच्या भजनाने गायन व सुंदर नृत्य सादर केले. वसाहतीमध्ये टाळ वाजवत आणि ढोल ताशांच्या गजरात विठ्ठलाची पालखी मिरवणूक करण्यात आली. रहिवाशांनी पालखीचे पूजन केले. पूर्ण वसाहतीला जणू काही पंढरपूरचे रूप आल्यासारखे वाटले. उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे तसेच कार्यक्रमाचे खूप खूप कौतुक करून अभिनंदन केले व शाळेच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विठू रायाच्या रंगात रंगले कोप्रोली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी रणिता ठाकूर / उरण रायगड

महाराष्ट्र ही केवळ संतांची भूमी नाही, तर ती तीर्थक्षेत्रांचीही भूमी आहे. इथे प्रत्येक पावलागणिक इतिहास आहे, भक्ती आहे आणि श्रद्धेचा सुगंध आहे. इथल्या नद्यांच्या काठावर, गड-किल्ल्यांच्या पायथ्याशी, डोंगररांगेत आणि गावागावात असंख्य तीर्थक्षेत्रे विखुरलेली आहेत, जी आजही लाखो भाविकांना आपल्या आकर्षणाने खेचून घेतात. पंढरपूर हे महाराष्ट्रातील सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्र मानले जाते. भगवान विठोबा आणि रुक्मिणी माता यांचे हे स्थान वारकऱ्यांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. "विठ्ठल विठ्ठल जय हरि विठ्ठल" या गजरात लाखो वारकरी दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला येथे पायी वारी करतात. हे एक भक्तीचे अद्वितीय उदाहरण आहे. वारी म्हणजे काय?वारी म्हणजे भक्तीचा एक सुंदर प्रवास.जसा आपण खेळायला जातो, तसा हे वारकरी विठोबाच्या भेटीसाठी जातात.

हातात टाळ, गळ्यात माळ आणि ओठांवर -"ज्ञानोबा-तुकाराम !" "पांडुरंग, पांडुरंग!" अशा गजरात ही वारी चालत असते.

याच विठू माऊलीच्या भक्तीचा सोहळा पाहायला मिळाला जिल्हा परिषद केंद्र शाळा कोप्रोली उरण येथे. येथील शाळेतील मुलांनी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहाने साजरी केली. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मुखात 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' चा नामघोष होता . आषाढी एकादशीचे अवचित साधून या शाळेत मुलांना आपल्या संस्कृतीचा वारसा जपता यावा याकरिता आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन कमिटी सदस्य आणि पालक ही उपस्थित होते. सर्व मुलांची एकच लगबग कुणी वारकरी





झाला होता, कुणी रखुमाई झाली होती, कोणी विठुराया झाले होते, प्रत्येक मुलांनी आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी वेशभूषा करीत आषाढी एकादशी विठू नामाच्या जयघोषात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# गव्हाण हायस्कूल मध्ये गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप सोहळा

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर

भारतीय जनता पार्टी उलवे नोड-२ आणि श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज आ भगत ज्युनिअर कॉलेज गहाणकोपर येथील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना बुधवार दिनांक २ जुलै २०२५ रोजी मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.गव्हाण विद्यालयाचे आधारवड अर्थातच नेतृत्व दातृत्व आणि कर्तृत्व यांचा त्रिवेणी संगम असणारे सर्वांचे प्रेरणास्थान सन्माननीय लोकनेते श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत आनंदात व उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी रयत गीत सादर करून कार्यक्रमाची उत्साहवर्धक सुरवात केली. याप्रसंगी रामशेठ ठाकूर साहेब यांनी उपस्थित सर्व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचा गौरव करताना विद्यालयाच्या प्रगतीचा आणि विद्यालयातील शिक्षकांचा देखील गुणगौरव केला त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे अधिक लक्ष केंद्रित करावे यासाठी मार्गदर्शन केले. तसेच संपूर्ण शाळा डिजिटल करण्यासाठी उरलेल्या सर्व वर्गात इंटरैक्टिव पैनल बसवून देण्याचे जाहीर केले.

या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य श्री जे एम म्हात्रे साहेब,जनरल बॉडी सदस्य श्री वाय टी देशमुख , विद्यालयाचे चेअरमन श्री अरुण शेठ भगत, जनरल बॉडी सदस्य श्री महेंद्र शेठ घरत सौ.रत्नाताई घरत, श्री भाऊशेठ पाटील,श्री विजयशेठ घरत,श्री अमर घरत,श्री हेमंत ठाकूर श्री विश्वनाथ कोळी , श्री अमर म्हात्रे, श्री भार्गव शेठ ठाकूर, श्री वामन म्हात्रे, श्री जयवंत देशमुख,श्री रोशन म्हात्रे,श्री सागर ठाकूर , सौ उषा महेंद्र देशमुख, श्री सुधीर ठाकूर, श्री सुहास भगत, श्री सुदर्शन घरत, श्री गोपाळ भगत,सौ सुजाता पाटील,श्री किशोर पाटील, श्री बी.टी कांबळे,श्री पी. के. ठाकूर,श्री भाऊ भोईर, सौ मीनाक्षी पाटील,श्री अनंता ठाकूर, श्री निलेश खारकर, सौ योगिता भगत,सौ निकिता खारकर आणि गव्हाण पंचक्रोशीतील सर्व सामाजिक कार्यकर्ते या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत गरीब गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा सोहळा संपन्न झाला.याप्रसंगी विद्यालयाच्या नवनिर्वाचित प्राचार्य तसेच रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य सौ ज्योत्स्ना ठाकूर मॅडम,





उपमुख्याध्यापक श्री लेंभे सर आणि पर्यवेक्षिका सौ शशिकला पाटील मॅडम यांनी मान्यवरांना तुळशीचे रोप देवून आदरपूर्वक स्वागत केले.

तदनंतर प्राचार्या सौ ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये गव्हाण विद्यालयाची उत्कर्षाकडे होत असलेली वाटचाल याबद्दल अधिक माहिती सांगत आदरणीय श्री रामशेठ ठाकूर साहेब यांनी विद्यालयासाठी केलेली विकासात्मक काम यांची सविस्तर माहिती सांगत श्री रामशेठ ठाकूर साहेब यांना धन्यवाद दिले.त्यानंतर श्री वाय. टी.देशमुख साहेब,श्री जे एम म्हात्रे साहेब आणि विद्यालयाचे चेअरमन श्री अरुण शेठ भगत साहेब यांनी देखील स्वतःच्या शालेय जीवनातील विविध उदाहरणे सांगत शाळा व शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांनी अधिक अभ्यास करावा यासाठी प्रेरित मार्गदर्शन केले.त्यानंतर विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना वह्यावाटप करण्यात आल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक श्री सागर रंधवे सर यांनी केले तर रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आणि जनरल बॉडी सदस्य श्री रविंद्र भोईर सर यांनी सर्वांचे आभार मानले. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्याने हा सोहळा अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाला.

# संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले दिंडी व पालखी सोहळे

दैनिक युवक आधार
पिलीव प्रतिनिधी
रघुनाथ देवकर

खंडप्राय देशाला नव्हे तर संपूर्ण जगाला नवल वाटाव्या अशा श्रीक्षेत्र पंढरपूर मधील श्रीविठ्ठल रुक्मिणी -मातेच्या दर्शनाची घाई सर्वांना आषाढी एकादशीच्या निमित्ताने झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले दिंडी व पालखी सोहळे पंढरपूर नजीक आले असून प्रत्येक वारकऱ्यांच्या, भाविकांच्या नजरा श्रीविठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनाकडे लागलेल्या आहेत. आज या सर्व दिंडी सोहळ्यातून बंधुरायांच्या भेटीचा योग अतिशय कौतुक भरल्या नजरेने सर्व वारकरी बांधव व भाविक भक्तांनी बहु गर्दीतून पाहिला. श्रीसंतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व श्रीसंत सोपान काका त्याचप्रमाणे




श्रीसंत तुकाराम महाराज व श्रीसंत सोपान काका महाराज यांच्या भेटीचा अलभ्य लाभ पुणे-पंढरपूर पालखी मार्गावरती मिळत असताना उपस्थितांना भारावून आले व असंख्य दिंड्या व पालखी सोहळ्यातील वारकरी भाविक भक्त यांनी आनंदाने नाचत बागडत टाळ मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषामध्ये कौतुक भरल्या नजरेने पाहिला. अनेकांना या जन्माचे सार्थक झाल्याचे दिसून येत होते आणि उपस्थितांमधून सुद्धा या नयनरम्य देखणा बंधू भावांच्या भेटीचा सोहळा आषाढी वारीच्या निमित्ताने मिळाला असल्याचे बोलून दाखवले. तर आता आम्हाला श्रीविठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनाची ओढ लागलेली आहे असे सांगत देहभान होऊन सर्व वारकरी व भाविक भक्त "जिकडे तिकडे चोहीकडे ,आनंदी आनंद गडे "या गाण्याचा अर्थ लक्षात घेऊन बेहोशपणे अत्यानंदाने श्रीक्षेत्र पंढरपूरकडे पावले टाकत चालू लागली.

# वारी शिक्षणाची, दिंडी पुस्तकांची :- लिहाखेडी येथे ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून आषाढी एकादशी साजरी

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

सिल्लोड :- गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच मुलांमध्ये संस्कारक्षम मूल्यांची रुजवणूक करून आपल्या संस्कृतीचे जतन व्हावे या उद्देशाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लिहाखेडी येथील बाल वारकऱ्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने ग्रंथ दिंडीचे आयोजन केले होते.प्रा.शिवराम साखळे आणि मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे विधिवत पूजन करून सुरुवात झाली..गावातील महिला भगिनींनी घरासमोर रांगोळ्या काढून पालखीचे पूजन करून बाल वारकऱ्यांचे स्वागत केले.. समोर चाललेली पालखी तुळशीवृंदावन डोक्यावर घेऊन चाललेल्या चिमुकल्या तसेच हाती भगवे निशाण आणि गळ्यात टाळ घेऊन वारकऱ्यांच्या वेशभूषेत *विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल* *ग्यानबा तुकाराम* च्या जयघोषात चाललेल्या दिंडीने गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.

विद्यार्थीनींनी पारंपरिक पांडुरंगाच्या गीतांवर ताल धरत,विद्यार्थिनी आणि महिला भगिनींच्या फुगडीने ह्या अनोख्या दिंडीची सांगता झाली..

मुख्याध्यापक सुधाकर बावस्कर, सज्जन टाकसाळे,सिद्धेश्वर भुतेकर, संजय मोरे,रुपेश भाले,उषा लुटे,विद्या बनसोडे,लिलाबाई रामेकर,मंदा इंगळे यांनी परिश्रम घेतले..



# दारूच्या नशेत ११२ वर खोटा कॉल; नांदगाव येथील आरोपीवर गुन्हा दाखल

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे

नांदगाव (ता.निफाड) येथील एका व्यक्तीने दारूच्या नशेत डायल ११२ या आपत्कालीन सेवेला खोटा कॉल करून पोलिसांना विनाकारण त्रास दिल्याप्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पो.शिपाई अविनाश कैलास सांगळे यांनी फिर्याद दिली आहे. दिनांक ४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ३.४५ वाजता, नांदगाव येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या परिसरातुन नवनाथ बाळू मोकळ, रा.नांदगाव या आरोपीने ही सेवा आपत्कालीन प्रसंगी वापरायची असते हे माहित असूनही त्याने दारूच्या नशेत डायल ११२ या अति तात्काळ सेवेवर खोटा कॉल करून पोलिसांना विनाकारण गोंधळात टाकले. या प्रकारामुळे सरकारी सेवेत अडथळा निर्माण झाल्याने, भा.न्या. सं.२०२३ (११७), महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ८५(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा.बाळासाहेब कांदळकर अधिक तपास करीत आहेत.

पोलीस खात्याकडून डायल ११२ ही आणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ सेवा असून खरोखरच गरज पडल्यास नागरिकांनी वापर करावा, मात्र तिचा गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते..
भास्करराव शिंदे